# मिरा भाईंदर महानगरपालिका

## स्थायी समिती सभा दि. ०८/०८/२००३

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थायी समिती सभा शुक्रवार दिनांक ०८/०८/२००३ रोजी सभा सुचना क्र. १३ दि. ०५/०८/२००३ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मा. स्थायी समितीच्या सभागृहात सकाळी ११.०० वा. आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. मोहन म. पाटील हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

### उपस्थित सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. मोहन म. पाटील | सभापती |
| २) | श्री. अग्रवाल धनराज नंदलाल | सदस्य |
| ३) | श्री. कुरेशी याकुब इस्माईल | सदस्य |
| ४) | श्री. चंद्रकांत सिताराम वैती | सदस्य |
| ५) | श्री. नलावडे दिनेश द. | सदस्य |
| ६) | श्री. गावंड हरेश लक्ष्मण | सदस्य |
| ७) | श्री. अशोक बळवंत पाटील | सदस्य |
| ८) | श्री. पाटील शरद केशव | सदस्य |
| ९) | श्री. म्हात्रे मिलन वसंत | सदस्य |
| १०) | श्री. आसिफ गुलाब शेख | सदस्य |
| ११) | श्री. नितीन गो. ठाकूर | सदस्य |
| १२) | श्री. मॉरस रॉड्रीक्स | सदस्य |
| १३) | श्री. हॅरल बोर्जीस | सदस्य |
| १४) | श्री. अनंत रामचंद्र पाटील | सदस्य |
| १५) | श्री. जोजफ जॉन घोन्सालवीस | सदस्य |
| १६) | श्रीम. रिटा शहा | सदस्य |

**मा. सभापती :-**

महानगरपालिकेचा जवळजवळ स्थायी समितीचा एक वर्षाचा कालावधी या ठिकाणी संपुष्टात येत आहे. त्या दरम्यान ज्या मागील सहकार्यानी आपल्याला जे चांगले सहकार्य केले आणि त्यांची कारकीर्द चांगल्या पध्दतीने या शहराच्या विकास कामासाठी उपयोगात आली. त्याबदद्ल जे सन्मा. सदस्य रिटायर झाले. त्या सर्व सदस्याचे मी प्रथम या ठिकाणी आभार व्यक्त करतो आणि नव्याने जे सदस्य नवनिर्वाचित म्हणून या ठिकाणी आले, त्यांच्याकडून या मिरा भाईंदर शहराच्या विकासाच्या दृष्टीकोनातून चांगले सहकार्य आणि चांगली सद्‌भावना उराशी बाळगून या शहराचा विकास करण्यासाठी खांदयाला खांदा लावून चांगले काम करतील अशी मी ईश्वरचरणी प्रार्थना करतो आणि नवनिर्वाचित सदस्याचे या ठिकाणी आणि स्थायी समितीच्यावतीने अभिनंदन करत आहे. त्याचबरोबर अधिकारी वर्गानी आणलेल्या विषयावर चर्चेमध्ये सदस्यांच्या सुरात सुर मिळवून सदस्यांच्या सुचना विचार करुन आणि सदस्यांना जास्तीत जास्त परीने समाधान देण्याच्या दृष्टीकोनातून जे चांगले सहकार्य अधिका-यांनी केलेले आहे आणि कायदयाचा बडगा आणि कायदयामध्येही काही गोष्टी बसल्या असतील त्या परिने त्या बसविल्या अशा त-हेची उदाहरणे आपल्या ठिकाणी आहेत. त्या सर्व अधिका-यांचे मी या ठिकाणी हार्दिक स्वागत करु इच्छितो आणि आज आलेल्या नवनिर्वाचित सदस्यांना पुन्हा हार्दिक शुभेच्छा देऊन आजची सभा सुरु करण्यासाठी सचिवांना सुचवत आहे.

**प्र. सचिव :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका स्थायी समिती सभा दिनांक ८/८/२००३ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय, दुसरा मजला, समिती सभागृह स्थायी समिती सुचना क्रमांक १३ दिनांक ५/८/२००३ सोबत विषय प्रकरणावर विचारविनिमय करण्यासाठी आयोजित करण्यात येत आहे.

**रिटा शहा :-**

सभा सुरु करावयाच्या अगोदर नवीन आठ सदस्य निवडून आले जुने आठ आहेत असे एकूण सोळा झाले. आपण माननीय सभापती श्री. मोहन पाटील यांना आपण अध्यक्ष म्हणून कन्टीन्यू केलेले आहे. त्या हिशेबाने त्यांनी आमचे अभिवादनसुध्दा केले हरकत नाही माझी कुठली. पण जेव्हा सोळा मेंबर नवीन आले. नविन मेंबरच्याखाली नवीन सभा सुरु झालेली आहे. तर अध्यक्ष तेच राहणार. ते तुम्ही कुठल्या कायदयाखाली आणि कुठल्या सेक्शनखाली तुम्ही केलेलं आहे ते तरी तुम्ही डिक्लेअर करा आणि त्याची तशी नोंद प्रोसिडिंगला घ्या तुम्ही. कारण कुठलीही मिटींग तुम्ही कायद्याने चालवा.

**प्र सचिव :-**

कलम दोन २१-(२) सभापती आपल्या उत्तराधिका-याची पोटकलम १ अन्वयेनेमणुक होईपर्यंत पदधारण केले पाहिजे. परंतु तो पुन्हा नेमला जाण्यास देखील पात्र आहे अशी कलम २१-(२) मध्ये तरतूद आहे.

**रिटा शहा :-**

देखील पात्र आहे. कंम्लसरी त्यांना पात्र ठरवायचं असं लिहिलेले नाही.

**प्र. सचिव :-**

खाली जे वाक्य आहे. ते पुन्हा निवडणुकीसाठी उभे रहावे याच्यासाठी आहे. पहिल्या एका महिन्यासाठी कन्टीन्यु आहे.

**रिटा शहा :-**

यात असें लिहिलेले आहे की ते पुन्हा निवडुन आले सोळा मेंबरमध्ये तर ते परत अध्यक्ष व्हायचे पात्र आहेत असे लिहिले आहे त्याच्यामध्ये.

**प्र. सचिव :-**

एक, स्थायी समिती कलम २० पोटकलम २ अन्वये तिच्या नेमणुकीनंतर तिच्या पहिल्या सभेत आणि त्यानंतर पुढिल प्रत्येक वर्षी त्याच महिन्याच्या तिच्या पहिल्या सभेत आपल्या सदस्यापैकी एकाची सभापती म्हणून नेमणुक केली पाहिजे.

**रिटा शहा :-**

केली पाहिजे, मी मान्य करते पण त्याच्यात असे डायरेक्ट डायरेक्शन दिलं नाही की तेच ठेवायला पाहिजे असं काही कंप्लसरी नाही.

**प्र. सचिव :-**

असं वाक्य आहे. सभापतीनी आपल्या उत्तराधिका-यात पोटकलम एक अन्वये नेमणुक होईपर्यंत पदधारण केले पाहिजे.

**रिटा शहा :-**

त्याच सभापतीनी.

**प्र. सचिव :-**

होय.

**रिटा शहा :-**

मग ठिक आहे. पण तुम्ही कायदयाने चाला ना. प्रोसीजरने चाला ना. तुम्ही कायदे दाखवले नाही आणि तुम्ही डायरेक्ट हे केले. मला असं वाटतं की ह्या महिन्याची दुसरी मिटिंग प्रोसीजरने बसवायला पाहिजे होते असे तुम्ही चारचौघ मिळून कायदा आहे असं तुम्ही कोणालाही बसून देणार तसं चालणार नाही.

**प्र.सचिव :-**

नाही, कायदयाचा अधिकारी त्याप्रमाणे आपण कायदा वापरतो.

**रिटा शहा :-**

कायदयाचा अधिकार आहे पण कायदा डिक्लेअर कुठे केला तुम्ही. डायरेक मिटिंग सुरु केली.

**प्र. सचिव :-**

हरकतीप्रमाणे खुलासा केलेला आहे.

**रिटा शहा :-**

हरकत आम्ही घेतलीनंतर केला ना. प्रोसीडिंगला नोंद घ्या तशी त्याची.

**धनराज अग्रवाल :-**

किती सभेपर्यंत जुने सभापती राहणार.

**प्र. सचिव :-**

पुढिल सभेतील सभापतीची नेमणुक सप्टेंबरच्या पहिल्या मिटिंगमध्ये होईपर्यंत पहिल्या मिटिंगपासून नवीन सभापती सुरु होतील.

**रिटा शहा :-**

म्हणजे एक वर्ष पूर्ण व्हायच्या अगोदर. मागच्या सभापतीचा एक वर्ष पूर्ण व्हायच्यानंतर.

**हॅरल बोर्जीस :-**

मागील सभापतीची निवड झाल्यानंतर त्या सभापतीनी कॉल केलेली पहिली मिटिंग. तिकडून त्यांचा कार्यकाल एक वर्षाचा. त्याच्या पहिल्या मिटिंगचं जे गेल्या वर्षी जी तुमची पहिली मिटिंग असेल तिकडून त्याचा एक वर्षाचा कालावधी.

**प्र. सचिव :-**

मागील महिन्याच्या शेवटी त्यांचा कालावधी संपतो.

**हॅरल बोर्जीस :-**

त्याची तारिख सांगा त्यांनी पहिल्या त्यांच्या अध्यक्षतेखाली जी पहिली मिटिंग घेतली त्याची तारीख सांगा.

**प्र. सचिव :-**

त्या सष्टेंबरच्या पहिल्या सभेपर्यंत.

**रिटा शहा :-**

१६ सप्टेंबरला पहिली सभा झाली होती.

**प्र. सचिव :-**

त्या महिन्यातील पहिली सभा १६ सप्टेंबरच्या अगोदर देखील किंवा मागे देखील.

**हॅरल बोर्जीस :-**

तोपर्यंतचे अध्यक्ष म्हणून.

**रिटा शहा :-**

म्हणजे १६ तारखेच्या अगोदर घेतली किंवा नंतर घेतली पण सप्टेंबरला.

**आसिफ शेख :-**

सन्मा. सभापतीसाहेब, सन्मा. सचिवसाहेब, सन्मा. उपायुक्तसाहेब, सर्व उपस्थित जुने तसेच नवनिर्वाचित सर्व स्थायी समिती सदस्य, उपस्थित सर्व अधिकारी वर्ग बंधुनो. आताच सन्मा. सभापतीनी नवनिर्वाचित आम्ही सर्व आठ सदस्याचं या ठिकाणी स्वागत केलेले आहे. त्याचप्रमाणे जे जुने सदस्य निवृत्त झालेले आहेत त्यांचे देखील या ठिकाणी त्यांनी जे सहकार्य प्रशासनाला केलं त्यांचे ही आभार या ठिकाणी व्यक्त केलेले आहेत. या ठिकाणी सन्मा. सदस्यांनी नवनिर्ववाचित या ठिकाणी स्वागत केलेलेच आहे. स्थायी समितीमध्ये ज्याप्रमाणे सभापतीसाहेबांनी सांगितले. त्याप्रमाणे आपल्या सर्वाना अधिकारी, पदाधिकारी वर्गाला हातात हात घालून या शहराच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न करावयाचा आहे आणि आम्ही प्रशासनाला मी या ठिकाणी अभिवाचन देतो की शहराच्या सर्वांगीण विकासासाठी आमचं सगळयांच यथायोग्य ते सहकार्य आपणास निश्चितपणे राहिलं आणि सर्वांनीच एक दिलाने, एक मनाने, एक मताने शहराचा सर्वांगीण विकास करण्यासाठी आपण सर्व कटिबध्द रहाल अशी अपेक्षा व्यक्त करुन या ठिकाणी आमचं स्वागत केले. त्याबद्दल सभापतीसाहेबांचे आणि सर्वांचे या ठिकाणी आभार व्यक्त करतो आणि चांगले सहकार्य आमच्यातर्फे लाभेल असं अभिवाचन देतो. धन्यवाद. जय हिंद, जय महाराष्ट्र.

(प्रभारी सचिवांनी प्रकरण क्र. ११८चे वाचन केले.)

**मिलन म्हात्रे :-**

पान क्रमांक ३ वर पाण्याच्या बोटिंगच्या संदर्भामध्ये जी चर्चा झाली होती. प्रश्न याच्यात काय दिलेला तो महत्वाचा नाही. शहरामध्ये पूर्णपणे अन्यथा आरोग्य आणि पाणी विभाग दोन्ही फार गंभीर बाब आहे. तिथे स्वतः जर आपण येथे डिसपेंसरी किंवा हॉस्पिटलमध्ये फिरले तर लहान मुलांमध्ये प्रमाण फार आहे. म्हणजे अतिसार, संडास, मलेरिया, कावीळ, पाण्यापासून जे विकार घडतात त्याची साथ आपल्या शहरामध्ये प्रचंड प्रमाणात आहे. तर मागच्या वेळेला ही चर्चा विस्तृतपणे झाली होती आरोग्याच्या दृष्टीकोनातून संपूर्ण महाराष्ट्रामध्ये मेंदुज्वराचे प्रमाण वाढलेले आहे. एखाद्या रोगाचे प्रमाण अती व्हावे का? तिथपर्यंत आपण वाट बघावी का? किंवा प्रशासनाने त्याकरिता काय केलं ह्याच्यावर उपाययोजना नक्की काय केली? म्हणजे ही चर्चा घडवून आणण्याकरिता हा विषय नव्हता. कोण कमी आहे कोण जास्त आहे किंवा कोण कुठे कमी पडले. प्रश्न तो नव्हता. प्रश्न हा आहे की जे काय आहे, आम्हाला जे कळलं त्यानुसार पाण्याच्या प्रश्नाबाबत आजही मुद्दाम मी उभा राहीलो आहे बोलायला. डि.एम.सी. साहेब, शहरामध्ये पाण्याच्या पाईप लाईन तीन चार ठिकाणी मोठ्या पाईप लाईन्स आजही तुटलेल्या अवस्थेत आहेत. आपण नुसते कार्यालयामध्ये बसतो. आपल्याकडे गाड्या दिलेल्या आहेत. मी स्वतः तक्रारी केलेल्या आहेत. या संदर्भात काय केले. एक तक्रार केली तेव्हा डॉ. बावस्कर साहेब माझ्याबरोबर होते. फाटकाजवळ मेन लाईन तुटली आहे. त्याच्यावर लोक आंघोळ करत होते. हे आपण लोकांनी बघितलं नाही म्हणजे तो पाईप फुटला आहे का हा उलट प्रश्न आम्हालाच अधिकारी लोक विचारतात. पाईप फुटला आहे का? हे आम्हांला लोक विचारतात. तेव्हा पाईप फुटला नसेल तर पाणी येणार कुठुन? जसे पाणी पाईपमध्ये असल्यावर येते तसे नसल्यावर बाहेरचे पाणी आतमध्ये जाते. ह्याच्यावर एक कंप्लाईन रिपोर्ट आला आहे का? गंभीर परिस्थिती आहे. प्रॅक्टीकली त्याच्यामध्ये काय आहे? हे सुध्दा बघायला पाहीजे. आता बरेचशा कनेक्शनमध्ये कनेक्शन करताना पाणी आतमध्ये जात आहे. ही जी सभा झाली त्यानंतर मला पण पत्र आलेले नाही. विषय गंभीर आहे. प्रशासनावर आरोप करण्याची माझी इच्छा नाही. डी.एम.सी. साहेब आपली सुद्धा जबाबदारी आहे. आपण ह्याच्यावर खुलासा केला तर बरे होईल.

**धनराज अग्रवाल :-**

सभापती साहेब, पुढच्या वेळी आम्ही असे दोन तीन प्रश्न मध्ये विचारले होते. तुम्ही त्याचं उत्तर काही दिलं नाही प्रोसिडींगमध्ये आम्ही काही देणार नाही. आणि अस चालणार नाही तर नियम तरी काय आहे प्रोसिडींगमध्ये विचारायचं की तुम्ही तुमच्या हिशोबाने ज्याना वाटेल त्याना उत्तर द्यायचं ज्याना वाटेल त्याना नाही द्यायचं अस काही आहे का?

**मा. सभापती :-**

प्रोसिडींग ज्या मंजुर करतो आपण ग्रॅमॅटीकल चुका असतात. त्या चुकावर चर्चा करायची आणि जर आपल्याला विस्तृत चर्चा करायची असेल तर आपण बसुन चर्चा करु शकतो.

**धनराज अग्रवाल :-**

तेच मी विचारत आहे.

**मा. सभापती :-**

प्रोसीडिंगमध्ये तुम्हाला विचारायची आवश्यकता नाही. आपण ग्रॅमेटिकल चुका दुरुस्त करुन घ्यायच्या आणि आपल्याला जो महत्वाचा विषय आहे, विषयाचे गांभीर्य आहृ तर चर्चा झाली पाहिजे.

**धनराज अग्रवाल :-**

सभापती साहेब, मी गांभीर्य विषयावरच बोलत आहे. पण तुम्ही त्यावेळी नकार करतात विरोधी सदस्य म्हणून नकार करता की, काय. हे मला माहित नाही. पण तुम्ही त्यावेळेला एकदम नकार करतात. आता काही बोलायचे नाही तर प्रत्येक माणसाला जर तुम्हाला आमच्याकडूनसुध्दा सहकार्य पाहिजे असेल तर तुम्ही सुध्दा आम्हाला सहकार्य दिले पाहिजे व आमचे म्हणणे सुध्दा आपण ऐकले पाहिजे. परत साहेब मी आपणास सांगू इच्छितो की कुठलीतरी एक पध्दत ठेवा. याच्यात चर्चा करायची किंवा नाही करायची.

**मा. सभापती :-**

जर एखादा विषय गांर्भीयाचा असेल तर चर्चा करावी.

**धनराज अग्रवाल**

गांर्भीयाचा विषय हा कोण ठरविणार? मला हा विषय गांर्भीयाचा वाटतो तुम्हाला तो वाटत नाही. त्याला काय करायचे. मला हा विषय गांर्भीयाचा वाटतो आपल्याला तो विषय गांभीर्याचा वाटत नाही. रोग शहरात पसरलेले आहेत आणि हॉस्पीटलमध्ये जाऊन आपण तपास केला तर तुम्हांला माहित पडेल तुम्हाला तो विषय गांभीर्याचा वाटेल किंवा नाही ते तुमच्या मर्जीवर आहे तरी याबाबत काहीतरी नियम ठेवा सभेमध्ये की कुठल्या टाईमला चर्चा केली पाहिजे किंवा कुठल्या टाईमाला नाही केली पाहिजे. तोंड बघुन तुम्ही उत्तरे देऊ नका. माझी तुम्हाला विनंती आहे.

**मा. सभापती :-**

तोड बघून उत्तर देत नाही आम्ही आपण त्या गांर्भीयाच्या विषयावर चर्चा करु आणि याच्यामध्ये ज्या ग्रॅमेटिकल मिस्टेक असतील त्याची दुरुस्ती करु.

**रिटा शहा :-**

साहेब, एक कन्फुझन आहे. महासभेतसुध्दा हा विषय येतो आणि स्थायी समितीतसुध्दा विषय आम्ही काढलेला आहे की प्रोसिडिंगची मंजुरी म्हणजे नेमणे काय? कायद्याखाली काय दिलेले आहे. कारण ग्रॅमेटीकल मिस्टेक त्या सुधारावयाची की आम्ही जे काही बोलले ते आमच्या बोलण्याप्रमाणे आले नाही तर ते सुचवायचे आणि ते सुचवताना डिस्कशन होणारच आहे. कारण आम्ही बोलणार की आम्ही असे बोलले नाही आणि आम्ही असे बोललो होतो हे असे डिस्कशन झाले नाही, आणि हे असे झाले होते असे बोलल्यावर ते परत समोरचे बोलणार आणि मग ते डिस्कशन नाही झाले तर काय झाले? म्हणजेच नेमका कायदा काय? प्रोसिडिंगमध्ये काय चुका झाले आहे त्या तुम्ही कशा सुधारणार? त्याच्यावर काय तुम्ही परत नवीन मिटींग लावणार आहात काय? हा विषय नेहमी नेहमी होत असतो. फक्त ग्रॅमेटिकल मिस्टेक सुधरावयाची, हा कायदा नाही आहे याच्यामध्ये. कायदा त्यासाठी बनत नाही. आपण काय आता नर्सरी के.जी.मध्ये नाही की, आपण ग्रॅमेटिकल मिस्टेक करु आणि त्या सुधरवण्यासाठी आपण प्रोसिडिंगची मंजुरी म्हणून आपण हा विषय घेऊ. मला वाटत नाही की या हिशोबाने हा विषय आणला आहे. हा कुठल्या हिशोबाने आणलेला आहे की प्रोसिडिंगची मंजुरी म्हणजे त्याचा अर्थ असा आहे की जेवढ्या मेंमबरने मिटींग दरम्यान काय बोलले त्याप्रमाणे त्यामध्ये डिस्कशन आलं नाही. आणि तो मेंबर उठून बोलणार की मी असं बोललो होतो आणि डिस्कशन असे झाले होते. त्याच्यावर परत चर्चा करायला पाहिजे. नेमके काय झाले होते आणि नंतर ती प्रोसिडिंग सुधारवयाची अशी पध्दत आहे. ग्रॅमेटिकल सुधरावयाची अशी पध्दत नाही. असं करुन तुम्ही मंजुर करुन घेता ते तुम्ही चुकीचे करता.

**मा. सभापती :-**

कोणत्या सेक्शनखाली आहे?

**रिटा शहा :-**

सेक्शन काही असु दयाना. आपण त्याच्या अर्थाचा अनर्थ करतो.

**मा. केळकर सो. (उप आयुक्त) :-**

सन्मा. सदस्य धनराजजी अग्रवाल यांनी विचारल्याप्रमाणे इतिवृत्त वाचून कायम करणे असा विषय रहात असतो. इतिवृत्तामध्ये जर किरकोळ स्वरुपाच्या सुधारणा जर प्रस्तावित करावयाच्या असल्या काही किरकोळ स्वरुपाच्या सुधारणा राहिलेल्या असल्या त्यामध्ये त्या सजेस्ट करु शकतो. त्यामध्ये गंभीर स्वरुपाची मोठी दुरुस्ती करणे प्रस्तावीत नाही. फक्त वाचनू इतिवृत्त कायम करणे असा तो विषय रहात असतो आणि त्यामध्ये ग्रॅमेटीकल शब्द साहेब बोललेत परंतु ग्रॅमेटीकल सुधारणा रहातातच. त्यापेक्षा एखादा शब्द चुकीने, अनावधाने राहून गेला असेल किंवा काही दुरुस्ती प्रस्तावित करावयाची असेल तर ज्या सदस्यांनी तो विचारला जर समजा इथे सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे यांचे स्टेटमेंट आहे. तर ते त्या स्टेटमेंटवर बोलले तर त्यांनी त्यामध्ये सुधारणा सुचवलेली नाही. पण इम्प्लीमेन्टेशनबाबत प्रश्न विचारला पण ह्या प्रश्नाबाबत आपण चर्चा नंतर करु शकतो.

**रिटा शहा :-**

माझे बोलायचे आणि विचारायचे तात्पर्य तेच आहे की नुसते आपण शब्द इथे तिथे टाकले. म्हणून सुधारावयाचे तसं नसतं हे. विषयाचा अर्थ तसा नाही. हया विषयाचा अर्थ असा आहे की रिटा शाह अमुक अमुक बोलली पण प्रोसीडिंगमध्ये त्या शब्दाचा वेगळा अर्थ करुन इन्टेश्नली हे चुकून झालं असेल. त्याच्यावर परत चर्चा व्हायलाच पाहिजे असं नाही की चर्चा नाही करायची. मी सांगते चर्चा,

डिस्कशन करायचे नाही, ठिक आहे. तसा कायदा आहे. सन्मा. सदस्य श्री. मिलन म्हात्रे बोलले असा इम्प्लीमेंटेशन तुम्ही करा. ते तुम्ही बोलले की नाही करायचे ते बोलले की या हिशेबाने तुम्हांला करायला पाहिजे. तुम्ही बोलले ह्या हिशोबाने होत नाही तर ते चर्चा नाही झाली तर काय झाले? त्याला आपण बोलणार काय?

**मा. सभापती :-**

इम्प्लीमेंटेशन हा प्रकार वेगळा आहे.

**रिटा शहा :-**

इम्प्लीमेंटेशन करणार बरोबर आहे. ते बोलले की, इम्प्लीमेंटेशन करा. तुम्ही बोलले की कायद्यात राहत नाही, तर ते नाही करणार. तर ते तुम्हाला नाही बसत असेल ते बोलले बसते तर तुम्ही बोलतात बसत नाही. हा वादावाद झाला तर ते डिस्कशन झाले ना शेवटी.

**मा. केळकर सो. (उप आयुक्त) :-**

हा वादावाद नाही आहे. सन्मा. सदस्य मिलन म्हात्रेजींनी काही सजेशन आपल्याला त्यामध्ये सुधारणा प्रस्तावित केलेल्या नाही आहेत फक्त त्यांनी त्यांची कल्पना सांगितली की अध्यापही असा प्रश्न सुरु आहे.

**रिटा शहा :-**

असे मी उदाहरण देते आहे.

**मा. केळकर सो. (उप आयुक्त) :-**

त्यांनी त्याच्यामध्ये सुधारणा प्रस्तावित केलेल्या नाही आहेत.

**रिटा शहा :-**

आता काहीतरी आमचा काहीतरी गंभीर तुमची चुक झाली याच्यामध्ये तर ती गंभीर चुक सुधारणार आहात की नाही तुम्ही? मग त्याच्यावर आम्हाला बोलायचा अधिकार आहे किंवा नाही?

**मा. सभापती :-**

जरुर आहे जर मी बोललेले प्रोसिडिंगमध्ये आलेले नाही तसेच सदस्य बोलले आणि प्रोसिडिंगमध्ये आलेले नाही, त्याच्यावर चर्चा होणे जरुरीचे आहे की ते का आले नाही.

**रिटा शहा :-**

शेवटी जें बोलणे झाले ते डिस्कशन झाले ना.

**मा. सभापती :-**

बरोबर आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मॅडमनी जे सांगितले बरोबर आहे. बऱ्याचशा वेळेला अडचणीचे काही मुद्दे प्रशासनाच्या वतीने राजगारणाच्या वतीने म्हणा, कधी कधी ड्रॉप इट केले जातात. मुद्दामहुन हेतुपुरस्पर काही लाईन गाळल्या जातात पण मागच्या वेळेला हा किस्सा घडला फार गंभीर बाब होती सन्मा. सदस्यांनी ते लाईटली घेतले परंतु एखादा असा गंभीर ठराव पास झाला असता तर त्याचे बिचाऱ्या त्या दोन नगरसेवकांना भोगावे लागले असते जे गैरहजर होते. गैरहजर असलेल्या नगरसेवकांच्या नावाने ठराव पास झालें ह्याला चुक कुठली म्हणायची, ग्रॅमेटीकल म्हणायची, साधी चुक म्हणायची की गंभीर चुक म्हणायची? पण एवढ्या मोठ्या महत्वाच्या चुकीवरती परत एकदा सांगतो मी कोणाची दुश्मनी काढत नाही. पण उद्या आपण इकडे नाही आहात पकडून चला तुम्हाला मंत्रालयात मिटींग आहे. तुम्ही बाहेर गेलात. तुमच्या नावाने एखादे वाक्य घातले किंवा एक पॅरेग्राफ घातला आणि चुकुन तुमच्याकडे शंभर सह्या दिवसाला येतात. त्याच्यावर तुमची सही घेतली तर तुम्ही सुध्दा अडचणीने येणार. पण एवढी मोठी महाचुक होऊन म्हणजे त्याला क्षम्य नाही त्या सर्व सदस्याना त्याचे गांर्भीय कळले नाही. पण अशा वेळेला ह्या ज्या काही मोठ्या चुका होतात त्या प्रशासनातर्फे लाईटली घेतल्या जातात. कारण जो तो आपल्या ह्याला त्याला वाचवायला बघतो. पण आता जर तुम्ही काही एक गेल्या दीड महिन्याच्या काही केसेस बघितल्या. ह्याच्यामध्ये माझ्या अंदाजानुसार नगरसेवकाच्या व्यतिरिक्त प्रशासनाच्यावतीने लिपीकापासून वरच्या कमिशनरपर्यंत कोणलाही अटक झालेली नाही. जे स्टॅंडींगचे मेंबर आहेत, सभापती आहेत, नगराध्यक्ष आहेत, महापौर आहेत, नगरसेवक आहेत यांनाच अटक झालेली आहे. प्रशासनाने चुका करायच्या आणि त्याचे परिणाम आमच्यासारख्या नगरसेवकांनी, म्हणजेच ज्यांचा एक वर्षाचा कालावधी आहे. बिचारे काही नविन आहेत त्यांना काहीच कळत नाही

अशा लोकांनी अनावधानाने ते भोगायचे. पण त्या मॅटरमध्ये सुध्दा मला चांगलं आठवतंय. प्रशासनाच्या वतीने माझे तर स्पष्ट मत होते की ज्यांनी कोणी चुक केली, ते गैरहजर असलेल्या नगरसेवकांची नावे टाकायची. त्यांचे एक एक पगार थांबवायला पाहिजे होते. काहीतरी पनिशमेंट पाहिजे होती काही पनिशमेंट नाही झाली म्हणजे ह्या चुका सारख्या होत जायच्या. गडबडीमध्ये चला चला चला, पळा पळा पळा, झालं झालं झालं, सगळे निघून गेले. पण पुढे काय? म्हणजे ज्या काही जाणूबुजून चुका होतात त्याच्यावरती फौजदारी प्रक्रियेध्ये गुन्हासुध्दा दाखल होतो. ही आपण माहीती दिली नाही सभागृहाला. ती दिली पाहिजे. कळले पाहिजें सगळ्यांना. आम्ही जाऊन पोलिस केस दाखल करावी का? केली पाहिजे त्याच्यावर. कारण उद्या आमच्यावर येत असेल तर अगोदर आम्ही त्याला सांगू की, तुमची चुक आहे तुम्ही सुधरा. गैरहजर नगरसेवकांच्या नावाने ठराव पास झाले. आता ह्यांच्यापेक्षा वाईट परिस्थिती काय असणार त्या बद्दल तुम्ही काही डायरेक्शन आता दिले नाही.

**प्रकरण क्र. ११८:-**

दि. ०५/०७/२००३ रोजीचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. १०२ :-**

दि. ०५/०७/२००३ रोजीच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करणेंस ही सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. हरेश गावंड. अनुमोदन :- श्री. दिनेश नलावडे.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्रभारी सचिवांनी प्रकरण ११९ चे वाचन केले )

**मिलन म्हात्रे :-**

सभापती साहेब, गेल्या वर्षभरामध्ये हा विषय पाच सहा वेळा तरी चर्चेला आला. त्या त्या वेळेला आपले तत्कालीन सदस्य लिओ कोलासो साहेब यांनी चांगली बाजु मांडली. आम्ही ही त्याच्यावरती बोललो. प्रशासनाच्या वतीने ज्या काही त्या त्या वेळेला लिस्ट दिल्या गेल्या त्या अपुऱ्या होत्या. ह्याला लिस्ट दिली नाही फक्त ठराव आला असेल हा. परंतु यापुढे त्याचे प्रत्यक्ष इम्प्लीमेंटेशन होईल. त्या वेळेला परत सभागृहाची परमिशन लागणार आहे. त्या वेळेला आतापर्यंतच्या सर्व लोकांनी दिलेले अर्ज, एखाद्या बिचाऱ्याला कळते, एखाद्याचे नातलग हुशार असतात, एखाद्याची विधवा बाई असते तिला काहीच कळत नाही. ती अनपढ असते, अंगठा मारते. तर असे काही अर्ज आपल्याकडे आले असतील. ते सर्व तसेच जे निधन पावले आहे. जे काही अपंग असतील किंवा कोणीही असतील त्या सर्वांचे तुम्ही खात्याच्या वतीने सुध्दा आपण खातरजमा करुन घेतली पाहिजे कि अशा नेमक्या किती केसेस आहेत आणि ती लिस्ट आणून एकदाच काहीतरी सद्‌गती लावावी.

**मा. सभापती :-**

पुढच्या सभेत मंजुरीच्या वेळेला प्रस्ताव आणण्यांत येईल.

**हरेश गावंड :-**

साहेब हे ५३८ मधले आहेत का?

**मा. सभापती :-**

नाही, ५३८ ला वारसा हक्क राहणार नाही.

**मा. केळकर सो. (उप आयुक्त) :-**

५३८ मध्ये राज्य शासनाने स्पष्ट उल्लेख केलेला आहे की ५३८ला अनुज्ञेय रहाणार नाही अनुकंपा तत्वाने किंवा वारसा हक्क.

**प्रकरण क्र. ११९ :-**

लाड समितीच्या शिफारशीनुसार वारसा पद्धतीने ''सफाई कामगार'' म्हणून नियुक्ती देणे.

**ठराव क्र. १०३ :-**

महानगरपालिका आस्थापनेवर सन १९९० पासून कार्यरत कायम सफाई कामगार श्री. महेंद्र चिंतामण म्हात्रे यांचे दि. ०५/०१/२००३ रोजी निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात त्यांची एकमेव वारस पत्नी हिने पतीचे जागेवर वारसाने नोकरीत सामावून घेण्यांस केलेल्या विनंतीस अनुसरुन शासन निर्णय क्र. अकंपा/१०००/प्र.क्र.२०/२०००/आठ, दि. २८/०३/२००१ व शासन निर्णय क्र. मागास-२२२०००२/ ५१०/प्र.क्र.५३/२००२/नवि-६, दि. १७/०८/२००२ अन्वये घाणकाम करणाऱ्या सफाई कामगारांची आर्थिक स्थिती सबळ नसल्याने त्यांच्या कुटूंबियांना नोकरीची शाश्वती मिळणे अत्यंत आवश्यक असून सफाई कामगार मयत झाल्यास त्यांच्या वारसास लाड समितीच्या शिफारशीनुसार वरील शासन निर्णयाच्या अंतर्गत तरतुदीनुसार मयत कर्मचाऱ्याच्या एका वारसास महानगरपालिकेत **''सफाई कामगार''** म्हणून रिक्त जागेवर नेमणूक देण्याची तरतुद असल्याने कै. श्री. महेंद्र चिंतामण म्हात्रे (सफाई कामगार) यांची वारस पत्नी श्रीमती. आरती महेंद्र म्हात्रे ह्यांना वारसा पद्धतीने महानगरपालिका आस्थापनेवर रिक्त असलेल्या **''सफाई कामगार''** या पदावर रु. २५५०-५५-२६६०-६०-३२०० या वेतनश्रेणीत नियुक्ती देण्यांस मंजूरी देण्यांत येत असून येणाऱ्या आर्थिक खर्चास मंजूरी देण्यांत येते.

**सुचक :- श्री. आसिफ शेख.** **अनुमोदन :- श्री. हरेश गावंड.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्रभारी सचिवांनी १२०चे वाचन केले )

**मिलन म्हात्रे :-**

ही जी लिस्ट दिलेली आहे. या लिस्ट मध्ये मी स्वतः मागच्या टर्मला नगरसेवक असताना मिरा रोड (प) येथील नाजरेथ आगार सत्संगच्या बाजुला म्हणजे ज्या सत्संगने कधी मिरा भाईंदर नगरपालिकेला रु. १००/- हाऊस टॅक्स भरला नाही. अशा सत्संगला महापालिकेने आठ इंचाची पाईप लाईन तत्पर दिली आहे. कोणाचे दिल्लीवरुन फोन आले आम्हाला त्याच्याशी काही देणं घेणं नाही आहे. परंतु ज्या संस्थेने आपल्या शहरा करिता त्याचे योगदान एका पैशाचे नाही. संस्था किती मोठी आहे? संस्था किती छोटी आहे तो प्रश्न नाही आहे. ती संस्था आपल्या शहराकरिता काय करते हे महत्वाचे आहे. त्या शहराला त्या संस्थेने काय आतापर्यंत दिले ते महत्वाचे आहे. असे असताना सुध्दा आज त्यांनी एक ओव्हर टँक बनवले. आपण बघा इकडे यांच्या संपुर्ण प्रिमायसेसमध्ये त्यांनी खाजगी ओव्हर टँक बनवले, जे आपण बनवू शकले नाहीत. म्हणजेच छोट्या छोट्या गावाकरिता म्हणजे त्याची एवढी तयारी आहे. सांगायचा दृष्टीकोन असा आहे की त्या लोकांना पाण्याची पुर्ण टाकी भरेपर्यंत आपण पाणी देऊ शकतो. त्याच प्रोजेक्टच्या बाजुला जो पाडा आहे त्या पाड्याला गेल्या दोन वर्षापासून मी सतत पाण्याच्या पाईप लाईनची मागणी करतो आहे. दोन किलोमिटरची असा काहीतरी ऐरिया आहे. तत्कालीन उपायुक्त श्री. शिवमूर्ती नाईक साहेब तिकडे गेले जवळ पाचशे ते सहाशे नागरिक त्यांना भेटले. साहेब आम्ही जवळ जवळ १२ वर्षे नगरपालिकडे टॅक्स भरतो आम्ही आपल्या इकडचे करदाते आहोत आमच्या जुन्या सत्तर सत्तर वर्षाच्या वसाहती आहेत. आम्हाला इकडे कसेही करुन पाण्याची व्यवस्था करा. नगरपालिकेकडून आजही टॅकर पाठविला जातो. टँकर जर उपलब्ध नसेल तर जवळ जवळ दहा दहा दिवस पाणी मिळत नाही. उपलब्ध नसेल तरच मी सांगतो जर उपलब्ध असेल तरच पाणी मिळतें पण जर यदा कदाचित त्या लोकांनी पाईप लाईन तिकडे आपण टाकली त्यांनी अर्ज भरलेले आहेत. तुमच्याकडे एक दोन दिवसात ते पैसे भरणार आहेत. तर त्या तिकडचे प्रस्ताव मंजुर असून माझ्याकडे स्वतःकडे जे ड्रॉईंग आहेत. त्याच्याकडे नगरपालिकेची पत्रे आहेत. प्रस्ताव मंजुर झाल्याची परंतु त्याचा विचार आजपर्यंत कोणी केला नाही. मागच्या वेळेला प्रशासनाच्या वतीने असं उत्तर दिलं की ह्या बजेटमध्ये त्याचे प्रोविजन नाही परंतु मला चांगल माहीत आहे की बजेटमध्ये प्रोविजन नसलेले प्रस्ताव आणि तिकडे आता पाईप लाईन बऱ्याचशा ठिकाणी पडतात. बजेटमध्ये प्रोव्हीजन नसल्याने कामे थांबली होती. ती कामे आजही चालु आहेत. म्हणजे

ती पाईप लाईन काय प्रोविजनमध्ये नव्हती.  आपल्या प्रोजेक्टमध्येच पाईप लाईन नव्हत्या.  ती काम चालु आहेत.  ज्याला मंजुरी मिळाली मी तर म्हणतो तुम्ही ३ इंचाची सी आय कास्टींग न टाकता जी.आय. टाका ती लोक ग्रूप कनेक्शन ध्यायला तयार आहेत. त्यांनी रितसर तुमचे विहित नमूण्याचे भरलेत ही जी लिस्ट दिलेली आहे ती लिस्ट पुर्णपणे चुकीची असून तुमच्याकडे त्या वेळेला मंजुरी दिलेली आर्थिक प्रशासकीय मंजूरी सभागृहात पाईप लाईनच्या प्रस्तावना मिळालेली आहे. त्याचं अवलोकन न करता तुम्ही लिस्ट बनवलेली आहे. असा माझा स्पष्टपणे या सभागृहात आरोप आहे. ते जर अवलोकन केल असते तर तो प्रस्ताव तुमच्याकडे आला असता स्वतः डि.एम.सी. साहेब आले त्यांनी एक महिन्यात म्हणजे २००० साली किंवा २००१ साली मे महिन्यामध्ये एक महिन्यात पाईप लाईन टाकण्याचे आश्वासन दिलेले होते.  पण आता २००३ मध्ये आहोत.  सव्वा वर्ष होऊनसुध्दा अजुन तिकडे पाईप लाईन नाही.

**मा. सभापती :-**

कुठल्या विभागात.

**मिलन म्हात्रे :-**

नाजरेथ आगार सत्संगच्या पाठीमागे तेथे जुनी वस्ती आहे व तिकडे आपली बालवाडी आहे. माझ्याकडे प्रस्ताव आहे.  संपूर्ण प्रोजेक्ट आहे ही लिस्ट त्याच्यामध्ये ॲड करावी अशी माझी आपणाला विनंती आहे.

**आसिफ शेख :-**

सन्मा. सभापतीसाहेब आमच्या प्रभागात आम्ही तिघांनी म्हणजे मी आणि सन्मा. सहकारी नगरसेवक आणि स्थायी समिती सदस्य श्री. नितीन ठाकूर आणि आमच्या सहकारी नगरसेविका ज्युडी डिसोजा आम्ही सर्वानी पत्र व्यवहार करून सूध्दा आमचे काम यामध्ये समाविष्ट झालेले नाही. भाईंदर पोलिस स्टेशन ते मुबारक कॉम्प्लेक्सपर्यंत जलवाहिनी टाकायची आहे तो सुध्दा प्रस्ताव देऊन बराच वेळ झाला तरी अद्यापही त्यावर कार्यवाही झालेली नाही इस्टिमेंट वैगरे सगळे तयार आहे.तयार असेल तर आपण रुलींग द्या आणि हे पण घेण्यात यावे. त्याचप्रमाणे अशोकनगर त्याठिकाणी पण जलवाहिनी टाकायची आहे आणि एक चंदुलालपार्क तर ह्या तिन्हीचा कृपया समावेश ह्या ठिकाणी घेण्यात यावा व याबाबत रुलींग द्या.

**एस. के. दशोरे :-**

सन्मा. नगरसेवक आसिफ शेख यांनी सुचविले त्याप्रमाणे एस्टीमेट तयार करण्यात आले असून मा. आयुक्तांची मंजुरी झालेली आहे.

**आसिफ शेख :-**

आता ज्याप्रमाणे नाजरेथ आगारच घेतले त्याप्रमाणे रुलींग द्या साहेब. सगळ एस्टीमेट तयार आहेत.

**मा. सभापती :-**

एस्टीमेट जर त्याचं मोठं असेल तर

**आसिफ शेख :-**

एस्टीमेट दहा लाखाच्या आतमध्ये आहे आणि स्थायीला पॉवर्स आहेत.

**मा. सभापती :-**

ज्या एस्टीमेट दहा लाखाच्या आतमध्ये असतील त्या एस्टीमेट ची कामे सन्मा. सदस्य श्री. अनंत पाटील यांची सुध्दा काही कामे आहेत.  सन्मा. सदस्य श्री हॅरल बोर्जीस याचे एक काम आहे.

**मिलन म्हात्रे :-**

ह्या वार्डामध्ये अर्धवट काम टाकलेले आहे. काही लोकांनी दादागिरी करून आपले काम थांबवले आहे.  त्याच्या पलिकडे स्लम आहेत.  त्या लोकांनी तुमच्याकडे अर्ज केलेले आहेत तीनवेळा पोलिस बंदोबस्तामध्ये लोक गेले होते, तरी ते लोक काम करुन देत नाहीत.  म्हणजे आता लोकांची दादागिरी आपण सहन केली तर आपण कुठेंच पाईप लाईन टाकू शकत नाही.  मोतीनगरचे एक काम जेवढे आपले इंजिनिअर बदलले त्या सर्वांना विनंती करुन झाली.  मटकर साहेब असतानापासून चार पाईप लाईन फक्त टाकायच्या आहेत पण कोंणीतरी यायचे.  ती माणसे आहेत आणि यांनी पळून यायचे आणि असे आपण काम करू शकत नाही.  त्या बाजुला जे लोक आहेत ते तुम्हाला प्रत्येक कनेक्शनचे पैसे भरायला तयार आहेत. त्या लाईन अजुन वॉश आऊट झालेल्या नाहीत.

**जोजेफ घोन्सालविस :-**

सन्मा. सभापती साहेब यामध्ये उत्तन या विभागाचे काम घेतलेले नाही.

**एस. के. दशोरे :-**

उत्तनविषयी पुर्ण इस्टिमेंट तयार झालेले आहे आणि मा. आयुक्तांची मंजुरी मिळालेली आहे आणि ते एस्टीमेंट दहा लाखाच्या वर आहे. तरी तो विषय पुढच्या महासभेला घेण्यात येईल.

**चंद्रकांत वैती :-**

सभापती महोदय, विषय क्र.६, ७, ८, ९ याच्यामध्ये या गोषवाऱ्यामध्ये हे सगळे डोंगरी चौक परिसरातील विषय आहेत आणि प्रत्येक विषयामधील चारही विषय बघितल्यानंतर त्याच्यामध्ये गावातील आपण इंटरनल लाईन बदलणार आहोत. अधिक मुख्य रस्त्यावरच्या जलवाहीन्या बदलणार आहोत असे आपण नेमके काय करणार आहोत? म्हणजेच बघा ते चार विषय आहेत डोंगरी बसस्टॉप ते चौक धक्का भागात सिमेंटची जलवाहीनी बदलून नवीन जलवाहिनी टाकणे, त्यानंतर डोंगरी ते दत्तमंदीर या भागातील सिमेंटची जलवाहिनी बदलून नवीन बिडाची जलवाहिनी टाकणे, पुन्हा डोंगरी गांव येथे जी.आय. जलवाहिनी टाकणे, पुन्हा चौक गांव येथे जी.आय. जलवाहिनी टाकणे. तर ह्याच्यामध्ये आपण मुख्य रस्त्यावरची जलवाहिनी वेगळी केलेली आहे आणि गावामधली जलवाहिनी वेगळी केली आहे असे काय आहे काय? आणि ते दहा लाखाच्या आतमध्ये बसावे म्हणून असे काही बायफर्गेशन केलेले आहे काय?

**एस. के. दशोरे :-**

डोंगरी बसस्टॉप ते चौक धक्का आपण मेनलाईन जी आहे रोडवर तिथे बदल करणार. डोंगरी ते दत्तमंदिर हे पण सिमेंटची लाईन होती पण हे जे डोंगरी आणि चौक गाव आहेत, तिथे आपण सी.आय. लाईन टाकू शकत नाही. कारण तिथे उंच सखल भाग आहे आणि अगदी खडक आहे तर तिथे आपल्याला जी.आय लाईन टाकायला लागले त्यामुळे ते आपण वेगळे करु.

**मिलन म्हात्रे :-**

सभापती साहेब, हे जे प्रस्ताव आले आहेत त्या ठिकाणी कामे ऑलरेडी चालु झालेली आहे. चालु होऊन महिना झाला आणि ही जी मंजुरी आपल्याकडे आहे, ठिक आहे. एक महिन्या अगोदर एर्मजन्सि होती. त्यांनी दिड महिन्या अगोदर ठराव आणला असता तर आपण मंजुर केला नसता का? केला असता आज उत्तन रोडला डोंगरीला ज्या ज्या ठिकाणी तुम्ही सांगताहेत रस्त्याच्या आजुबाजुला चार इंचाचे सी.आयचे पाईप पडले आहेत. पाईप लाईन पडून ऑलरेडी काम सुरू झालेली आहे.

**एस. के. दशोरे :-**

सदरचे काम आतापर्यंत कुठलेही काम सुरू करण्यात आलेले नाही.

**मिलन म्हात्रे :-**

मग ही पाईप लाईन कुठची आहे.

**एस. के. दशोरे :-**

हे एम.जी.पी.चं काम चालु आहे आपल्या टाकीसाठी ते काम चालु आहे.

**मिलन म्हात्रे :-**

उत्तनला सुध्दा काम चालु आहे. एरिया आणि लाईन आणि तुमचे रस्ते तेच आहेत.

**एस. के. दशोरे :-**

आतापर्यंत आपल्यातर्फे कुठले काम सुरू करण्यात आलेले नाही.

**हॅरल बोर्जीस :-**

त्यांना व्यवस्थित माहिती द्यावी. कदाचीत म्हात्रे साहेबांच्या समजण्यामध्ये चुक झाली असेल संपुर्ण जे काम डोंगरीचे आणि उत्तन ते एम.जे.पीच्या माध्यमातून चालु आहेत त्याचा या कामाशी कुठेही संबंध नाही.

**एस. के. दशोरे :-**

डोंगरी, उत्तन, चौक येथे फक्त एम.जे.पी.चे काम चालु आहे. टाकी आणि फिडरमेन त्याचं काम चालु आहे.

**मिलन म्हात्रे :-**

चार इंचाची फिडरमेन.

**एस. के. दशोरे :-**

चार इंचाचे आपले कुठलेही काम चालु नाही.

**मिलन म्हात्रे :-**

अहो, पाईप लाईन पडल्या आहेत चार इंचाच्या.

**एस. के. दशोरे :-**

ज्या इंटरकनेक्टेड लाईन आहेत. त्याचे काम चालु आहे.

**मिलन म्हात्रे :-**

अहो, कुठे कुठे एम.जे.पी. सांगते की आमचे काम संपले. माझ्या इकडे सांगितले ना वार्डमध्ये की आमचे काम संपले. नगरपालिकेचे राहिले आता आमचे सगळे टेंडर सगळे संपलेले आहे.

**एस. के. दशोरे :-**

जे ३ कोटीचे ॲडिशनल काम घेतलेले आहे ते आहे आता.

**मा. सभापती :-**

आपण आता ॲडिशनल आपल्या स्कीममधून जे पैसे उरले. आणि उत्तन करिता एक नविन स्कीम मंत्रालयातुन मंजुर करुन घेतली. त्या स्कीमचे काम आता चालु आहे.

**मिलन म्हात्रे :-**

हे जे आपण दिलेले आहे याच्याबद्दल काही आमच्या सदस्यांना माहिती आहे किंवा नाही.

**हॅरल बोर्जीस :-**

मागे सव्वा तीन कोटीच्या ज्या निविदेतून हे डोंगरी उत्तनपरिसर जो ५०एम.एल.डी योजनेमध्ये समाविष्ट केला नव्हता तर त्या योजनेतून वाचलेल्या पैशातून हे जे डोंगरी, उत्तन, राई, मोर्वा, मुर्धाचे काम होते त्याच्यातून त्या सव्वा तीन कोटीचे ते काम आहे.

**एस. के. दशोरे :-**

याच्यात फक्त टाक्यांचे काम मेन फिडरलाईनचे काम आहे. डिस्ट्रिब्युटर्स हार्डली १.८ किलोमीटर आहे. बाकी काही झालेले नाही.

**मिलन म्हात्रे :-**

काय आहे की मी चार इंचाच्या पाईप लाईन बघितल्या म्हणून मी बोलतो आहे कारण मेनच्या फिडरलाईन होऊच शकत नाही.

**एस. के. दशोरे :-**

बरोबर आहे त्याचे, ते डिस्ट्रिब्युशनमध्ये आहे. पण हार्डली १.५ किलोमीटर आपले ते एकुण १२ किलोमीटर आहे.

**मिलन म्हात्रे :-**

तर आता तिथे ब-याचशा लगतच्या जेवढ्या सोसायट्या आहेत या लोकांनी आपल्याकडे ड्राफ्ट भरलेले आहेत त्यांचे लाखो रुपये आपल्याकडे जमा आहेत आणि अनेकवेळा तिकडच्या सोसायटीचे रहिवासी लोक आपल्याकडे येऊन जातात. अमुक एक काम झाल्यानंतर ती पाईप लाईन टाकण्यात येईल, लाईन फिटिंग झाल्यानंतर पाईप लाईन टाकण्यात येईल, असे चार महिन्यापासून मी ऐकतो. माझ्याकडे अशा पाच सहा सोसायट्या आहेत की ज्यांनी पैसे भरले आहेत. आपल्याकडे चार चार कनेक्शनचे अडीच अडीच तीन तीन लाख रुपये भरले आहेत, पण या ना त्या कारणास्तव मी त्या रोडवाल्यांना पण जाऊन भेटलो सोसायटीतून पैसे कलेक्ट केल्यानंतर अडीच तीन लाख जेव्हा तुम्ही जमा करता किंवा सगळे लोक पैसे देत असतात जे सेक्रेटरी कॅशिअर पैसे जमा करतात त्यांना लोक भावनेने पैसे देतात की आपल्याला पाणी येणार आहे. ते पैसे त्या लोकांनी आणून भरले. तरी आता सोसायट्यामध्ये मारामा-या चालू झाल्या. चार महिने झाले पाणी का येत नाही? कनेक्शन का लागत नाही? आणि जवळ जवळ आपले सोनम बिल्डर आहेत त्याचे गेट आहे त्यापासून ते थेट तुमच्या कनकियापर्यंत पाईप लाईन पडून झालेल्या नाहीत आणि ज्या काही पाईप लाईन टाकल्या त्या अजून वॉश आऊट किंवा अजून वर्किंगमध्ये नाहीत. लोकांनी पैसे भरुन काही चुका केल्या आहेत का? हे रस्त्याचे काम वर्षभर चाललेले आहे. याच्यासाठी आपण काही लोकांना सुविधा करुन देणार आहोत की नाही? त्यालोकांनी रितसर तुमच्याकडे पैसे भरलेले आहेत. त्यांचे कनेक्शन रितसर मंजुर झालेले आहेत महिना एक पंधरा वीस दिवस महिना ठिक आहे. नागरिकांनी कितपर्यंत थांबायचं. पेट्रोल पंपाच्या पाठिमागे आतील बाजुला टी कनेक्शन न दिल्याने संपुर्ण आतमध्ये पाईप लाईन गेल्या नाहीत.

त्या पेट्रोल पंपाच्या उजव्या बाजूला सगळीकडे अजूनही कनेक्शन नाहीत.  जवळ जवळ दहा ते बारा सोसायट्यांचा हा प्रश्न आहे.

**मा. सभापती :-**

काशीमिरा रस्त्यावरील जो मुख्य रस्ता जो आपल्या डॉ. हेडगेवार रस्ता आहे. त्या रस्त्यावर ज्या पाईप लाईन असतील आणि ज्या सोसायट्यांना पाईप लाईनची आवश्यकता असेल त्याचा संपुर्ण सर्वे करून घ्या. तशा पध्दतीची कारवाई डिपार्टमेंटने करण्यात यावी.

**मिलन म्हात्रे :-**

किती दिवस लागणार चार महिने झाले.

**धनराज अग्रवाल :-**

सभापती साहेब हे जे आपण प्रस्ताव आणले.  बारा, एक कॅन्सल करून अकरा.  याचे सर्वे कोणी केले.  काय हिशोबाने सर्वे झालेला आहे.

**एस. के. दशोरे :-**

या बाबतीत सन्मा. नगरसेवकांनी पत्र दिले होते त्याच्यानंतर आमच्या इंजिनिअर लोकांनी सर्वे केले. आणि जे फिजिबल वाटले आपण इस्टिमेटमध्ये घेतले.

**धनराज अग्रवाल :-**

सन्मा. नगरसेवक आता तीन चार नगरसेवकांनी सांगितले आम्ही जें पत्र दिले त्याचा याच्यात उल्लेखच नाही म्हणजे ते व्हीजीबल नाही आहे.आता जे तीन चार नगरसेवकांनी सांगितले आम्ही पत्र दिलेले आहे.  इव्हन माझ्याप्रभागात सुध्दा इंजिनिअर घेऊन दाखवलं आहे की पाईप लाईन सडली आहे आणि त्याचे कनेक्शन ट्रान्सफर करा दुसरी पाईप लाईन टाका ते तुम्ही बघा तर तुम्ही अजुन सहा महिने झाले तरी त्याच्यावर काही होत नाही मग हे एकदम इंमपोर्टटं आहे की सर्वे कोणी केला.

**एस. के. दशोरे :-**

आपल्याकडे सर्व लाईन टाकुन झालेली आहे फक्त शिफटींगच्या केस बाकी आहेत.

**धनराज अग्रवाल :-**

हे बघा साहेब त्यावेळी पाईप लाईन फुटली होती आज माझ्या घरासमोरील पाईप लाईन फुटली आहे.  चार दिवस झाले आणि पाणी खराब येते.  तसेच लोक आजारी पडतात त्याची जबाबदारी आता कोणाची आहे.

**एस. के. दशोरे :-**

लाईन पडते तेव्हा आमच्याकडे तक्रारी येतात. आम्ही लगेच दखल घेतो आणि ते काम करतो.

**धनराज अग्रवाल :-**

साहेब चार दिवस झाले तक्रार आम्ही केलेली आहे फोनवर लेखी केली नाही. प्रत्येक तक्रार लेखीच केली पाहिजे का?

**एस. के. दशोरे :-**

तसे काही नाही.

**धनराज अग्रवाल :-**

मग ते तुम्ही बदलत का नाही?

**एस. के. दशोरे :-**

नाही शिफ्टिंगचे म्हणजे आपल्याकडे नवीन लाईन टाकण्यात आलेली आहे.  पण शिफ्टिंगचे चार्जेस जोपर्यंत शिफ्टिंगसाठी अर्ज येत नाही आम्ही चार्जेस घेत नाही तोपर्यंत बदलू शकत नाही.

**धनराज अग्रवाल :-**

ते अर्ज कशाला करणार तुम्ही त्यांना कळवा, तुमची लाईन शिफ्टिंग करायची आहे.  त्यांना काय माहित आहे तुम्ही नवीन लाईन कशाकरिता टाकली आहे त्यांना माहित नाही.  त्यांना खराब पाणी येते मग आम्हाला सांगतात पाणी खराब येते.

**एस. के. दशोरे :-**

त्याप्रमाणे त्यांना सुचना देणार आणि लगेच शिफिटंग करु.

**धनराज अग्रवाल :-**

पण शिफ्टिंगचे चार्ज म्हणजे तुमची पाईपलाईन सडलेली आहे म्हणून तुम्ही त्यांना दुसरीकडे शिफ्टिंग करणार आहेत त्याचे चार्जेस कशाला भरणार? नगरपालिका दुसरी लाईन देते आम्हाला काय करायचं आहे. आम्ही चार्जेस भरलेले आहेत.

**एस. के. दशोरे :-**

शासन नियमानुसार त्यांना चार्ज भरायला लागेल. शिफ्टिंग चार्ज भरायला लागेल.

**शरद पाटील :-**

नगरपालिकाच जर लाईन पूर्ण बंद करुन नवीन लाईन टाकत असेल तर शिफ्टिंग चार्ज कसा भरायचा त्या नागरिकांनी.

**मा. सभापती :-**

आपण तो विषय आणणार आहोत.

**धनराज अग्रवाल :-**

सुजाता ते बंदरवाडी रस्ता दोन्ही बाजूमध्ये सहा इंच पाईप लाईन.

**शरद पाटील :-**

नंबर नाही पत्र दिलेले आहे त्याचं.

**एस. के. दशोरे :-**

दोन नंबर आहे. वसुंधरा ते सुजाता अपार्टमेंट. दोन नंबरला घेतलं नवघरला १५० ची पाईप लाईन टाकायची.,

**रिटा शहा :-**

सभापती साहेब माझे अधुरे राहिले होते. आता सभापतीसाहेबानी सांगितले की हा विषय नाही म्हणून हे घ्यायचं नाही. मी विषय म्हणून नाही बोलले आपण जलवाहिनी टाकायची मंजुरी कशी घेतो. आपल्याला जिथे लाईन टाकायची तिथे आपल्या शहरामध्ये एवढा मोठा गुन्हा झाला कोणाला माहिती नाही आणि आपल्या रोडवर एवढी मोठी जलवाहिनी सायलेंट पार्ककडे टाकून घेतली आणि ती जॉइन्टसुध्दा करुन घेतली आणि बिल्डरने बिल्डिंग बांधायला पाणी वापरल ते प्रोसीडिंगमध्ये घ्यायचं नाही. त्याची चर्चा करायची नाही. त्याच्यावर आपण गुन्हा नोंदवला आहे. हे सभापती साहेब बोलले मला मान्य आहे, हा विषय नाही. पण तुम्ही असे बोलले ते मला खरोखर दुःख वाटत आहे की एवढा मोठा गुन्हा आपल्या शहरामध्ये झाला आणि तुम्हाला त्याच काही पडले नाही. तुम्ही बोलता याला इन्क्ल्युड करायचं नाही. चर्चेत तरी घ्या ना त्याला. घ्यायला आपल्याला काय फाशी लागणार आहे का ?

**मा. सभापती :-**

नाही, फाशीचा विषय नाही.

**रिटा शहा :-**

चर्चा मी केलेली आहे. विषय काढलेला आहे. जलवाहिनी तिथे टाकून घेतलेली आहे. प्रोसीडिंगच्या मुंजुरीशिवाय टाकलेली आहे आणि त्याला जॉइन्टसुध्दा मंजुरी शिवाय टाकलेली आहे आणि त्याला जॉइन्टसुध्दा करुन घेतली आहे. हा विषय आपण आपल्या शहरापुढे आणायचा. बाजुला राहिला ते सर्व पेपरमध्ये आले. आपण आपल्या मिटींगमध्ये पण डिस्कशन करु शकत नाही का त्याला? एवढा मोठा गुन्हा झाला आहे शहरामध्ये ज्याच्या मनात आलं तो जाऊन कनेक्शन करतो ज्याच्या मनात आलं तो उचलून पाईप लाईन जोडतो. चालतं काय शहरामध्ये.

**मा. सभापती :-**

साहेब, तुम्ही बोलतात त्याला मी रुलींग दिलेलंच आहे पुढचा विषय घ्या.

**शरद पाटील :-**

सभापती महोदय, आता धनराजजींनी सांगितलं पाईप लाईन बदली केल्यानंतर शिफटींग आपण करुन द्यायला पाहिजे. आपण बोलतात पुढच्या मिटींगला आपण विषय घेणार आहोत. पण सध्या परिस्थिती आमच्या प्रभागात आहे जी आमची जुनी लाईन आहे त्याला प्रेशर इतकं होतं की दुसऱ्या माळ्यापर्यंत पाणी चढत होते. त्यामध्ये तिथे काम चालु करुन मला वाटतं १५ ते २० दिवस महापालिकेच्या कर्मचाऱ्यांनी मेहनत केली. येथे खड्डा खोदा तो जॉईन्ट खोला, तो टेल एन्ड खोला, किंवा तो वॉल खोला. सर्व खोलून म्हणजे १५ ते २० दिवस मेहनत करूनही त्याला फॉल्ट कुठे

कोणाला मिळालेला नाही आणि आज त्या लाईनला पाणी येत नाही. म्हणजेच जिथे दुसऱ्या माळापर्यंत पाणी चढत होतं तिथे ग्राऊंड फ्लोअरला पाणी करंगळी एवढं पाणी येते आणि आता नविन लाईन आपल्या टाकलेल्या आहेत म्हणजे मला वाटतं त्या लाईन टाकून वर्ष ते दीड वर्ष व्हायला आले ते आपण अजूनही चालू करत नाही आणि त्याच्यावर आता धोरणात्मक निर्णय घ्यायचा म्हणजे पुढच्या मिटींगला घेणार. पुढच्या मिटींगला घेणार म्हणजे पुढच्या मिटींगपर्यंत पाणी येंतच नाही त्याच्यासाठी आपण काय करायचे?

**एस. के. दशोरे :-**

नविन चालु केली आहे वॉश पण केलेली आहे. शिफ्टिंग करणेचे बाकी आहे.

**शरद पाटील :-**

हां नविन लाईन चालु केलेली आहे. त्याला शिफ्टिंग करायचं पण शिफ्टिंग करायचं तो वादच राहिलेला आहेच ना? शिफ्टिंग कोणी करायची? खड्डा एकच खोदत आहोत. बोरींग चार्ज चार ठीक होते. तुम्ही खड्ड्याचा सुध्दा चार्ज चार मागताहेत हे सर्व चुकीचे आहे, योग्य नाही.

**एस. के. दशोरे :-**

जुने खड्डे बंद करुन नवीन खड्डे खोदावे लागतात.

**शरद पाटील :-**

नवीन आणि जुन्याचा प्रश्नच येत नाही जी लाईन गेली आहे ते मी खात्रीपुर्वक सांगतो की एक खड्डा खोदल्यानंतर ती जुनी लाईन तिथेच आहे आणि नवीन लाईन सुध्दा आपण तिथेच टाकलेली आहे त्याच्यात वादच नाही.

**एस. के. दशोरे :-**

धोरण जेव्हा आपण ठरवतो.

**शरद पाटील :-**

माझे तर स्पष्ट म्हणजे आहे की धोरण जर आल्याला ठरवायचे असेल नगरपालिका जर जुनी लाईन बंद करत असेल तर नवीन लाईनवर त्यांना कनेक्शन फ्री त्यांना करुन दद्यावे हे नगरपालिकेचे प्रथम कर्तव्य आहे. कारण नागरिकांना माहीत नाही की कशासाठी लाईन टाकलेली आहे सन्मा. सदस्य धनराजजी बोलले तो विषय बरोबर आहे. पाणी येत नाही आज दोन महीने झाले मी स्वतः माझ्या कनेक्शनला पाणी येत नाही. मी माझी पाईप लाईन बदली केली त्याच्या पाईप लाईन चालु केल्या परत तेच बोलत असेल आणि आम्हाला काही निर्णय मिळत नसेल तर कुठे जायचे सात दिवस अजून वाट पहावी लागेल. सात दिवस अजून खाली चकरा माराव्या लागणार.

**मा. सभापती :-**

मिरा भाईंदर परिसरामध्ये पाण्याची योजना कार्यान्वित झाली त्यानंतर ठिकठिकाणी ज्या सिमेंटच्या जलवाहिन्या आहेत त्या आपण शिफ्टिंग करतो. हा विषय या ठिकाणी आलेला आहे. शहरामध्ये भाईंदर पूर्वेला सन्मा. सदस्य शरद पाटील यांनी जो विषय या ठिकाणी मांडलेला आहे या विषयामध्ये भाईंदर पुर्वेचें पाणी ४० तासाच्या जवळपास येते आणि काही अंशी या शहरामध्ये पाण्याचे प्रेशर नाही. पाण्याची बोंबाबोंब चालु आहे. केळकर साहेब, पावसाच्या सिजनमध्ये सदस्यांच्या तक्रारी येता कामा नये आणि पाण्यासाठी ज्या पध्दतीने डिपार्टमेन्ट काम करते त्याबद्दल आम्हाला संशय नाही. पण जर नुसते प्रयत्न करुन आपण ज्या पध्दतीने आपण हमाली करतो, आपण काम करुन घेतो आणि निष्पन्न काही होत नसेल तर उपयोग नाही. तर त्या पध्दतीची आपण कुठली समिती नियुक्ती केलेली आहे, त्याचा अहवाल आहे आणि कोणत्या पध्दतीने काम झाले पाहीजे आणि सन्मा. सदस्यांनी तक्रार केल्यानंतर नागरिकांची तक्रार आहे आणि नागरिकांना सर्वतोपरी आपल्याला पाणी पूर्णपणे दिलं पाहिजे अशा पध्दतीची प्रशासकीय भुमिका असायला पाहिजे याबाबत सन्मा. सदस्य शरद पाटील यांनी जी भुमिका मांडली आहे त्या भुमिकेशी सभागृह संमत आहे. कृपया डि.एम.सी. साहेब ह्याच्यावर खुलासा द्यावा.

**मा. केळकर सो. (उप आयुक्त) :-**

सन्मा. सर्व नगरसेवकांनी यामध्ये विशेषतः भाग घेतला या चर्चेमध्ये आणि आपल्या मिरा भाईंदर, शहरामध्ये पाण्याचं दुर्भिक्ष पुर्वीपासून आहे. आणि आता जे आपल्याला ५० एम.एल.डी. पाणी प्राप्त झाले त्यामध्ये अनेक ठिकाणी त्यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या वतीने मेनलाईनचे काम बऱ्याच भागात पूर्ण झाले. काही भागामध्ये ईंटरनल पाईप लाईन ज्या टाकावयाच्या आहेत त्या

नगरपालिकेने टाकायच्या आहेत आणि आजच्या सभेमध्ये जो प्रस्ताव आलेला आहे, एकुण ११ विषयाचा. एकुण ११ विषय आले. ह्यामध्ये बहुतेक विषय असे आहेत की ज्यामध्ये पूर्वी ग्रामपंचायत होती किंवा नगरपालिका होती, त्यामध्ये सिमेंटच्या पाईप लाईन टाकलेली आहे तरी ते अत्यंत जुन्या सिमेंटच्या पाईप लाईन आहेत तरी त्या बदलणे आता क्रमप्राप्त आहे. त्या कालबाह्य स्वरुपाच्या असल्यामुळे आणि आता प्रेशरने पाणी येणार असल्यामुळे त्या सिमेंटच्या पाईप लाईन ह्या फुटतील तरी त्या बदलणे आवश्यक आहे. यामध्ये दशोरे साहेबांना आज प्रशासनाच्या वतीने सांगु इच्छितो की त्यांनी अगोदर जिथे जिथे सिमेंटच्या पाईप लाईन त्या बदलण्यासाठी प्राधान्याने कारवाई करावी व त्यानंतर स्टेप बाय स्टेप आपल्याला ज्या प्रभागामध्ये जलवाहीन्या टाकायच्या आहेत प्रामुख्याने त्या जलवाहीन्यासाठी कालबध्द कार्यक्रम पुढच्या स्थायी समितीपुढे त्यांनी शिफारस करावी आणि आजच्या आपण याला सभेमध्ये आज जी अकरा कामे घेतलेली आहेत यानंतर जी कामे करावयाची आहेत त्यासाठी कालबध्द स्वरुपाचा कार्यक्रम पाणीपुरवठा विभागाने पुढील सभेवर कारण की पाण्याचा प्रश्न सर्वांशी संबधित प्रश्न आहे. आणि सर्व प्रभागात जलवाहीन्या टाकणे अत्यावश्यक बाब आहे. नाझरेथ आगराचा विषय घेतला कारण नाझरेथ आगराबद्दल माहीती आहे की, त्या ठिकाणी पाण्याची टंचाई आहे आणि लोक कुठुन कुठुन पाणी आणतात आणि या भागातील शहरातील अवस्था ही बघितलेली आहे तरी या सर्व भागामध्ये जलवाहिनी लवकरात लवकर टाकावी अशी प्रशासनाची इच्छा आहे आणि तो कालबध्द कार्यक्रम दशोरे साहेबांनी पुढील सभेवर सादर करावा धन्यवाद.

**रिटा शहा :-**

तीन नंबरचे आपण दशोरे साहेब क्लिअर करा. नवीन लाईन टाकणार आहात की बदलून टाकणार आहात.

**एस. के. दशोरे :-**

जुनी लाईन खराब झालेली आहे नवीन लाईन टाकण्यात येणार आहे.

**रिटा शहा :-**

मग साहेब तुम्ही तसा विषय दुसऱ्या मिटींगला आणा. कारण की तुम्ही लाईन टाकण्याचा उल्लेख केलेला आहे. त्याच्यात लाईन बदलायच्या आहेत असा उल्लेख नाही.

**एस. के. दशोरे :-**

बदलायचे म्हणजेच जी जुनी लाईन आहे.

**रिटा शहा :-**

आणि तुम्ही खाली लिहिलेले आहे बीडाची लाईन काढू. असा स्पष्ट विषय आणा तुम्ही पुढच्या मिटींगला. आता हे पास करू नका, माझे त्याच्यावर ऑब्जेशन आहे.

**आसिफ शेख :-**

सन्मा. सभापती साहेब प्रकरण क्र. १२० जलवाहिनी टाकण्याच्या कामास व इतर कामाना आर्थिक प्रशासकीय मंजुरी देण्याबाबत या ठिकाणी अनुक्रमांक १ ते १२ विषय आहेत आणि त्यामध्ये सन्मा. नगरसेवक मिलन म्हात्रे, धनराजजी अग्रवाल आणि अनंत पाटिल आणि सन्मा. सदस्य शरदजी पाटील आणि आमचे विषय आम्ही जे सांगितले अशोक नगर भाईंदर पोलिस स्टेशन ते मुबारक कॉम्प्लेक्स आणि चंदुलाल पार्क हे असे ते विषय सर्व विषय ॲड करुन या कामांना मंजुरी देण्यात यावी असे मी या ठिकाणी सांगतो. सन्मा. सभापती रुलिंग दिलेलेच आहे. जी कामे दहा लाखाच्या आतमध्ये आहेत ती कामे आणि एस्टीमेंट सगळ तयार आहे त्याला मंजुरी देण्यात यावी.

**मिलन म्हात्रे :-**

सभापती साहेब माझे म्हणणे ह्याच्यामध्ये असे निघाले की ही लिस्ट परिपुर्ण करताना पहीला शहरामध्ये ५० एम.एल.डी.जो प्रोजेक्ट होता त्याच्यातल्या काही ज्या बाकी लाईन्स राहिलेल्या आहेत जे ठराव नगरपालिकेने मागे त्या प्रस्तावाना मंजुरी दिली आहे. आर्थिक प्रशासकीय मंजुरी दिली आहे. परंतु ती कामे रखडत पडलेली आहेत. तुम्हाला दोन उदाहरणे दिली, एक मोती नगरचे आणि एक आमच्या नाझरेथ आगाराचे, अशी जी सर्व प्रकरणे आहेत त्याची लिस्ट तुम्ही तयार करा आणि मंजुरी घेऊन ठेवा ना. म्हणजे तुमच्या हातात क्लेरिफिकेशनमध्ये आणि तुमचे आताच भाषण झाले त्याच्यामध्ये कुठेही उल्लेख नाही. आपल्या इकडे ५० एम.एल.डी. ची पुर्वीची जी स्कीम होती त्याच्यातली जी पेंडींग कामे आहेत आणि तत्कालीन नगरपलिकेने आणि आताच्या महानगरपालिकेने पाईप लाईनचे मंजुर केलेले प्रस्ताव, ह्याचे तूम्ही कागदोपत्री परमिशन घ्यायला तुमचे काय जाते?

प्रश्न पेडींग आहेत ना, मागच्या स्कीममधील आपल्या या शहरात ज्या भाईंदर शहर करिता स्कीम आली उत्तन वगैरे भागानंतर आपण त्याच्यामध्ये ॲड केले त्याबद्दल आमचे काही ना नाही करावे, कारण की, ते सुध्दा नागरिक आहेत, पैसे भरतात. पण ज्या लोकांकरिता मुळ स्कीमही आली त्याच्यातील प्रस्ताव अजुन पुरे झाले नाहीत. मग त्याचा असा उल्लेख न करता आपण ओव्हर टेक कसे काय करता, ते न करताना जे मुळ इकडच्या एरीयातील ठराव बाकी असतील तर ते पहिल्यांदा मंजुर घ्यावेत. ह्याच्याबरोबर ते सुध्दा करावे असे आम्ही सांगतो. काय होते बघा दशोरे साहेब मग सांगणार अहो आम्हाला त्याची मंजुरी नाही मिळाली आणि आम्ही कसे काय टाकणार ते मला ही जवळ जवळ दिड वर्षे उत्तरे मिळालेली तर प्रस्ताव आम्हाला शोधावे लागतील तुम्ही आणून कॉपी द्या व मी त्यांना त्या कॉपी दिलेल्या आहेत. आता नगरपालिकेला सबमिट झालेले पेपर नगरसेवकाने परत कॉप्या आणून त्यांना दयायच्या म्हणजेच तुमच्या कॉप्या कुठे गेल्यात किंवा तुमच्या फाईली कुठे गेल्यात आणि रितसर डाईंगनुसार माझ्या कव्हरिंग पत्रासोबत मी त्यांना वुईथ ड्रॉईंग कुठे कुठे पाईप लाईन फिरवायच्या कशा कशा पाईप लाईन टाकायच्या हे सगळे दिलेले आहे. ते सर्व त्यांना मिळाले नाही म्हणुन माझ्याकडे असलेले सर्व पेपर मी मटकर साहेब असताना दिलेले आहे आणि हे जे बाकी प्रस्ताव आहेत तरी त्यांचा विचार करावा.

**मा. सभापती :-**

मुलतः प्रश्न असा आहे की जी ५० एम.एल.डी. योजना होती त्या योजने अंतर्गत जी कामे राहिली असतील, किती किलोमीटर लाईन टाकली आपण ५० एम.एल.डी.मध्ये? दशोरे साहेब याबाबत माहिती दयावी.

**एस. के. दशोरे :-**

पूर्वीची ५४ किलोमीटर होती आणि आता ६० किलोमीटरपर्यंत टाकण्यात आलेली आहे.

**मा. सभापती :-**

४ किलोमीटर लाईन उरल्यानंतर ज्या ४ किलोमीटरमध्ये जर समावेश झाला नाही तर आपल्या बजेटमधून आपण तशा लाईन टाकून घेऊ. तसे प्रस्ताव तुम्ही आणून द्या आणि त्याला आणि त्या लाईन टाकून घ्या. जी नवीन आपण योजना या ठिकाणी सुरु केलेली आहे ज्या आपल्या ५० एम.एल.डी. योजनेमधून जो पैसा मंजूर झाला होता. तरी उरलेला जो पैसा होता त्या पैशातून आपण उत्तन येथे नवीन योजना चालू केली. त्याच्यातून ज्या लाईन टाकण्यात आल्या त्या लाईन टाकू आपण आणि आपल्याकडे जो पैसा या पाणी पुरवठा खात्याच्या बजेटमध्ये तरतूद आहे, त्या तरतुदीमध्ये जशी आपली प्रकरणे असतील आणि जी अत्यावश्यक प्रकरणे आहेत, पाण्याची पाईप लाईन प्रकरणे अत्यावश्यकच आहेत, प्रश्न येतच नाही. ज्या शहरामध्ये ज्या ठिकाणी वस्ती आहे नागरी वस्ती आहे त्यांना पाणी मिळत नसेल. ती अत्यावश्यक बाब आहे. तशी प्रकरणे संपूर्णपणे सर्वे करुन आपण प्रत्येक सदस्यांना कळवून ती प्रकरणे आणा आणि आपल्या बजेटमध्ये कार्यान्वीत करुन टाकावीत.

**मिलन म्हात्रे :-**

सभापती साहेब आपण इकडे म्हणता की तरतूदीमधले पैसे बाकी राहिलेत ते आधी उत्तन विभागाला फिरवले हे बरोबर आहे. माझ्याकडे लेखी उत्तर आहे की, नगरपालिकेच्या बजेटमध्ये आर्थिक तरतूदच नाही.

**मा. सभापती :-**

लेखी काय आहे माहित नाही मला. पण ही जी योजना आपण ठेवली साडेतीन की तीन कोटीची आहे.

**हॅरल बोर्जीस :-**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून जी कामे सध्या चालू आहे त्याच्यामध्ये उत्तन, डोंगरी आणि चौक या तीन ठिकाणी पाण्याच्या टाकयाचे काम चालू आहे.

**मा. सभापती :-**

आणि ती जी स्कीम आहे ती आपण इम्प्लीमेंटेशन करत नाही. एम.जे.पी. करते.

**मिलन म्हात्रे :-**

माझे म्हणणे आहे की, पूर्ण परत एकदा लक्षात घ्या. आपण आता थोडयावेळापूर्वी काय बोललात की हया स्कीममध्ये निधी बाकी राहिलाय आणि तो बाकी राहिलेला निधी आम्ही तिकडे फिरवला म्हणजे प्रशासनाने तुम्ही प्रशासन म्हणजे आपणच चालवतो हे दशोरेनी फिरवला अस थोडीच

बोलू शकतो. आयुक्तानी फिरवला नाही, एम.जे.पी.ला आपण कळवले ना. की हा निधी तुम्ही तिकडे वापरा म्हणून एक माझ्याकडे लेखी असं उत्तर आहे की आपण जे प्रस्ताव पाठवलेले आहेत तेव्हा ५४ किलोमीटर काम पूर्ण झाले होते. पुढंच तुम्ही जे ५४ किलोमीटर दिलय ना ते फेडर लाईनच आहे. अंतर्गत जलव्यवस्थेचे नाही साहेब, माझ्याकडे सगळी पत्र आहेत, अख्खी फाईल आहे तुम्ही जे म्हणताय ते फेडरलाईनच. फेडर लाईनचा मेहरबानी करुन येथे उल्लेख करु नका. फेडर लाईन इज ए फेडर लाईन. त्या मेन रोडला पडणाऱ्या पाईप लाईन आहेत. अंतर्गत जलव्यवस्थेचा वाद उपस्थित झालाय. आमची हरकत अशी आहे की, जर तुमचा तिकडे त्या ठिकाणी निधी उपलब्ध होता, तर तुम्ही उत्तन फिरवला, एम.जे.पी.ला सांगून. तर मग इकडच्यासाठी ज्या शहराकरिता मुळ स्किम बनवली गेली. ज्या शहरकरिता त्यातल्या जे बाकी पाईप लाईन राहिली आहे त्याचा तुम्ही तो निधी फिरवताना विचार का केला गेला नाही? आम्हाला उत्तर आले निधी नाही म्हणून तुम्हाला टाकता येत नाही, पहिले सांगितलं किलोमीटरची तरतूद नाही. किलोमीटरची तरतुद नाही बरोबर आहे. त्याच वेळेला आमचा आग्रह असा होता की तुम्ही ५०-६० किलोमीटर कागदोपत्री मंजुरी देऊन ठेवली असती तर बर झालं असतं. आज ज्या हाणामाऱ्या होतात तर त्या झाल्या नसत्या. त्यावेळेला ऐकल गेलं हा फक्त ६० किलोमीटरची जाणूनबजून घेतली गेली आहे. मेन रोडला जर ५४ किलोमीटरची पाईप लाईन धावली असती आणि त्याला जेवढे बायपास आहेत त्याच्या जवळजवळ चौपट पाईप लाईन तुमची पडणार आहे हे अगदी शुध्द अगदी सुर्यप्रकाशाएवढे स्वच्छ आहे. चौपट त्याची लांबी विचारु नका. निदान चारपटीने त्या पाईप लाईन पडणार आहे ५० x ४ = २०० झाले. पण त्याचा विचार कोणी केला नाही कागदोपत्री किलोमीटर पास केले ते एक्सेस होते म्हणून टाकता येणार नाही, अशी उत्तरे मला मिळाली आहेत आणि जे तुमचे गणित आहे ना, तुम्ही सांगता एकीकडे बोलताना निधी जास्त राहिला म्हणून उत्तनला फिरवला. अहो निधी जास्त राहणार कसे आमच्या इकडची पाईप लाईन पडायच्या आहेत बाकी त्याला मंजुरी मिळाली नाही. प्रस्ताव तुमच्याकडे पेन्डींग आहेत, ते पहिले पुरे करा. जी मुळ स्किम आहे ती पुरी करा ना मग तिकडे जा ना. पाणी तुम्ही आता लगेच देणार आहात का? भाईंदरला विशिष्ट काही ठिकाणी पाणी द्यायचे नाही. का? तर पाईप लाईन पडल्या नाहीत. आता लिगल बिल्डिंग आहेत प्लान पास झालेले आहेत, सी.सी.आर.टी आहेत अशा बिल्डिंग समोर पाईप लाईन नाहीत. जे भाईंदरचे करदाते आहेत एक एक फ्लॅटचा अडीच ते तीन हजार टॅक्स घेतात. पाण्याचे कनेक्शनचे तुम्ही पैसे घेणार आहात. अशा लोकांना पाणी नाकारुन बाहेरच्या इतर वस्तीत पहिले देणार हे उचित होईल का? पहिले या शहराकरिता ज्या मुळ तुमची जी स्किम होती त्याच्याबद्दल काय ते बोला त्याच्यामध्ये किती बाकी आहे. ते का राहीले? निधी का उपलब्ध झाला नाही? एरिया किलोमिटर, रनिंग किलोमिटर का कमी घेतली गेली? याचे क्लेरिफिकेशन आम्हाला पाहीजे.

**एस. के. दशोरे :-**

आपण जे सांगितले की आम्हाला निधी नाही आहे. हे जे तुम्हाला उत्तर २००१-०२ किंवा २००२-०३ बजेटसाठी दिले असेल. आता ते बजेट २००३-०४ चे आहे ज्याच्यामध्ये आपण साडेपाच कोटीची तरतूद नवीन जलवाहिनी टाकण्यासाठी केलेली आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मग तुमचे पत्र का नाही आले आम्हाला त्याच्याबद्दल की आपण हा प्रपोजल आहे ह्या बजेटमध्ये अशी प्रोव्हीजन झालेली आहे आणि हा पाईप लाईनचा प्रस्ताव आता टाकण्यात येईल हे उत्तर अजुनपर्यंत का आले नाही?

**एस. के. दशोरे :-**

आपण जी सुचना दिली आहे. ते पुढच्या स्थायी समितीला देऊ.

**मिलन म्हात्रे :-**

दोन वर्षापूर्वीचा प्रस्ताव आहे. तुमच्याकडून उत्तर आले पाहिजे की आपण प्रपोजल पाठविलेले आहे. प्रपोजल ह्याच्यामध्ये निधी उपलब्ध नव्हता. आता उपलब्ध झालेला आहे. आपले हे काम या वेळेला करण्यात येईल अजून आलेलं नाही ते जर पाठवले असे चार लाईनचे पत्र आज वेळ फुकट नसता गेला.

**दिनेश नलावडे :-**

सभापती साहेब, माझा एक विषय हा १२० वर ११ क्रमांक जो आहे. दशोरेसाहेब, आपण जो आर.एम.पी. पार्क वर टँकरपॉईंट जो दिलेला आहे. गळती थांबण्याकरिता ती गळती काढून झाली आहे.

**मा. सभापती :-**

११ नंबर रद्द करण्यात आलेलं आहे.

**दिनेश नलावडे :-**

पण त्या ठिकाणी आपण गळती काढली. आपण उभे राहिलेलो त्या ठिकाणी तुम्ही स्वतः आलेले. आज ती गळती काढल्यानंतर टॅकर पॉईंट तिथून त्या टँकर गल्लीमधून निघत नव्हते. खड्डा न भरता या खड्डयावरुन त्या पाईपावरुन आता कमीत कमी ५० तें १०० टँकर जातात आता तो खड्डा काय बरोबर बुजवलेला नाही आणि त्या ठिकाणी वारंवार पाणी लिकेज होते आणि पाईप लाईन ६०० मिलीमीटर व्यासाची आहे. त्याच्यामुळे जेसलपार्क परिसरात प्रत्येक वेळेस पाण्याचा त्रास होतो लोकांना. प्रत्येक खड्डा नाही बुजवला आणि काही नाही त्याच्यावर टँकर कशाला चालु केले आपण. सभापती साहेब आपल्याला कल्पना आहे आपण स्टँन्डींगमध्ये जो तो पॉइंट बंद करण्याचा आपण ठराव इथे मंजुर केला पण अजून देखील त्याच पॉइंटवरती टँकर भरले जातात. जेसल पार्कच्या टाकीवरती त्या ठिकाणी पाणी भरल्यामुळे त्या टाकीवर प्रॉब्लेम येतो पाणी भरण्यामध्ये. तसंच नवघरची टाकी आज चालु झालेली आहे. त्या ठिकाणी पण पॉईंट चालु केलेला आहे. तिथे पणं टँकर भरल्यामुळे लोकांना पाणी द्यायला अडचण येते व टाकी भरायला प्रॉब्लेम येतो. जैसल पार्क आणि नवघर टाकी दोनच ठिकाणी टँकर भरण्यासाठी ऑथरेटी कोणी दिली. तुम्ही काय मंजुर करुन घेतले का तसे. टाक्या भरपुर ठिकाणी आहेत आज तुम्ही मला सांगा टोटल टँकर किती जातात टाकी वरुन जेसल पार्क पॉईंटवरती आर.एम.पी. पार्क आणि नवघरच्या टाकीवरुन.

**एस. के. दशोरे :-**

९० टँकर जातात. ४०-४५ असे

**दिनेश नलावडे :-**

तुम्ही आम्हाला वारंवार काय सांगता कि इकडे टँकर भरायचे असल्यामुळे आम्ही पाण्याची टाकी भरु शकत नाही. म्हणजे तुम्ही कायम स्वरुपी तिथे टँकर ठेवणार का ?

**एस. के. दशोरे :-**

आता आपण सुधारणा करुन नवघर टाकी भरायला घेतलेली आहे आणि ३-४ दिवसात पूर्णपणे रिझल्ट मिळेल.

**दिनेश नलावडे :-**

३-४ दिवसामध्ये दशोरे साहेब, तुमचे हमेशा हेच उत्तर येतं. ह्याच्यामुळे तिकडे त्रास होतोय आणि हे पॉइंट इतर ठिकाणी पण आपण हलवु शकतो. आज आर.एम.पी. पार्कच्या लोकांचा अजुन पर्यंत भडका चालु आहे. तिकडे टँकर चालु आहेत. चौपाटीच्या बाजुला टँकर लागायचे आज ते टँकर गल्लीमध्ये लागलेले आहेत. नगरपालिकेने जो रोड बनवला तो रोड पूर्ण खराब झालेला आहे आणि तिथे रात्रंदिवस टँकर चालु आहेत. लोकांना त्या ठिकाणी खुप त्रास होतो आणि आपण इथे केलेली चर्चा निष्फळ होते. आपण त्यावर घेतलेले निर्णय अंमलामध्ये येत नाही. ह्याला जबाबदार कोण? सभापती साहेब, तुम्ही ह्याच्यावर रुलिंग द्या, माझं अस मत आहे. दोन्ही पॉइंट त्या ठिकाणाहुन हटवले गेले तर सर्व नागरिकांना सोसायट्यांना विथआऊट टँकर पाणीपुरवठा होऊ शकतो.

**एस. के. दशोरे :-**

बांगा सांगा येथे काढायला सुचना दिली होती पण तिथे सन्मा. नगरसेवकांनी लेटर दिले की, जागा आमची आहे. मग त्यांचा ७-१२ उतारा घेतला आम्ही. नंतर त्यांच्याकडुन ॲग्रीमेंट घेतले. ते म्हणतात जागा आमची आहे आणि त्याच्यावर चर्चा चालु आहे.

**दिनेश नलावडे :-**

सभापती साहेब, बांगा सांगा इथे जरी पॉइंट काढला तर तो जेसल पार्कच्या टाकीचा पॉइंट झाला मग तर त्याच लाइनवरती पॉइंट काढला पाहिजे काय इतर ठिकाणी कुठे पॉइंट नाही का काढु शकत? म्हणजे एकाच लाईनवरती दोन दोन पॉइंट काढले तर पाणी भरु शकत नाही. आपण

टाकीवरती हमेशा मला तसंच उत्तर येते अधिका-यांकडुन तिथे पॉईंट बंद झाले. आम्ही सुरळीत पाणी देऊ शकतो.

**शरद पाटील :-**

तिकडच्या लोकांना टँकर पाणी लागतच नाही.

**दिनेश नलावडे :-**

टँकरच पाणी आज सर्रास चालु आहे.

**शरद पाटील :-**

अहो तिकडच्या लोकांना लागते ना पाणी ते.

**दिनेश नलावडे :-**

लागत नाही, ज्यांना नळ कनेक्शन असताना नियमाप्रमाणे सर्वांना नळ कनेक्शन आहेत पण ज्यांना आज टँकर येत नव्हते त्यांना आज टँकर दयायची वेळ आली.

**शरद पाटील :-**

आता ठराव असा झालेला आहे. ज्यांना कनेक्शन असेल त्यांनी २७५ रु. भरुन नगरपालिकेकडुन टँकर घेऊन जायचे आहे.

**दिनेश नलावडे :-**

ठराव झालेला आहे. तरी अजुन २७५ रु. नी टँकर मिळत नाही. त्यांच्याकडे टँकर कमी आहेत. हयाबाबत दशोरेसाहेबांशी चर्चा केलेली आहे. ठराव मंजुर करुन घेतलेला आहे. तरी लोकांना त्या पद्धतीने पाणी मिळत नाही. नियम धाब्यावर बसवले जातात. सभापतीसाहेब आपण दशोरेसाहेबांना सांगा टँकरचा पोइंट कुठे खोलायचा आहे?

**रिटा शहा :-**

पोइंट बंद करा. त्यांना नको असेल तर कशाला चालु ठेवता.

**दिनेश नलावडे :-**

आपण आर.एम ची पार्कचा पोइंट ठराव मंजुर केलेला आहे. तो अंमलामध्ये आणा ना.तसेच आपण कनकियाचा नक्की केलेला होता. हयाच्या अगोदर तिथुन पाण्याचे टँकर यायचे व आता कनकियात पाण्याचे टँकर येण्याची अडचण काय आहे. तिकडे खुली जागा आहे. आणि इकडच्या दोन्ही टाक्या आपल्याला भरण्यासाठी मिळतात.

**मा. सभापती :-**

हरकत नाही दशोरेजी, जे बंगा संगाचे बोलतात तो पॉइंट आपण हलवतो त्या पुढे जर ऑबजेक्शन आले तर ते ऑबजेक्शन आपण क्लिअर करा आणि १० ते १५ दिवसामध्ये आपण तो पॉइंट हलवुन टाका. १५ दिवसात तो हलला पाहिजे.

**रिटा शहा :-**

सभापती महोदय, तिस-या नंबरचा जो जलवाहिनी टाकण्याबाबतची जी चर्चा वाढली आपल्यासोबत त्याच्यामध्ये स्पष्टपणे लिहीलेले नाही की, सिमेंटची लाईन बदलुन लाईन टाकण्याबाबत असे लिहिले आहे म्हणजे वितरण लाईन टाकणे म्हणजेच नवीन लाईन टाकणे असा भ्रम होतो त्याच्यामुळे.

**मा. सभापती :-**

काही लाईन आपण अशा पण घेतलेल्या आहेत.

**रिटा शहा :-**

ज्या घेतलेल्या आहेत त्याबाबत ऑब्जेक्शन नाही. जे घेतलेले आहे परंतु बाकी लिहिलेले आहे की बिडाची लाईन बदलुन असे टाकायचे आहे. याच्यामध्ये विषय असा झालेला आहे की वितरण लाईन टाकायची आहे त्याचा अर्थ असा झाला की नवीन लाईन टाकायची आहे म्हणजेच वितरण लाईन नाही आहे.

**मा. सभापती :-**

तिन नंबरचा खुलासा काय आहे भाईंदर पूर्व हनुमान मंदिर झुणका भाकर केंद्र याबाबत सविस्तर माहिती द्यावी.

**एस. के. दशोरे :-**

तिथे जुनी बिडाची लाईन आहे आणि तेथील नागरिकांना दुषित पाणीपुरवठा होत आहे. त्यामुळे ती लाईन बदलायची आहे.

**रिटा शहा :-**

समजलं तुम्हाला बदलुन टाकायची आहे मग तुम्ही पुढच्या मिटिंगला तसा विषय आणा असे बोलते.

**मा. सभापती :-**

आता विषय आलेला आहे पाण्याच्या पाईपलाईनच्याबाबत ठीक आहे. दुरुस्ती करुन घ्यावी.

**(सभागृहात गोंधळ).**

**मा. केळकर साो.(उप आयुक्त) :-**

मा. सभागृहाला माझी विनंती आहे की जुन्या सिमेंटच्या पाईप लाईन ज्या आहेत त्यावर शासनाच्या सुद्धा इंस्ट्रक्शन आहेत.

**रिटा शहा :-**

ते मला मान्य आहे साहेब तुम्ही म्हणतात त्या बदलायला सुद्धा पाहिजेत परंतु तुम्ही तसा उल्लेख करावा.

**मा. सभापती :-**

जनरल विषय जो आलेला आहे तो सिमेंटच्या पाईप लाईन बदलण्याबाबतचा विषय आलेला आहे.

**आसिफ शेख :-**

सन्मा. सभापती साहेब मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत उत्तन चौक राई मोर्वा राईगांव

**रिटा शहा :-**

माझा विषय चालला असताना तुम्ही मध्ये का बोलता?

**आसिफ शेख :-**

मी सन्मा. सभापतींना सांगत आहे. हा विषय मंजुर करायला हवा. एका विषयाला तुम्ही एवढा वेळ घेणार तर काय उपयोग आहे का?

**रिटा शहा :-**

सन्मा. सभापती साो.मी काय बोलते की याच्यामध्ये दुरुस्ती करुन घ्या की सिमेंटची लाईन बदलुन नवीन लाईन टाकणेबाबत अशी शंका निर्माण होते की तिथे नवीन (वितरण) लाईन टाकण्याची आहे का तुम्हाला.

**मा. सभापती :-**

ठीक आहे. त्याबाबत दुरुस्ती करून घेण्यात यावी.

**मिलन म्हात्रे :-**

मा. सभापती साहेब आपण ज्या जुन्या लाईन बदलत आहेत आणि नवीन लाईन टाकत आहोत. परंतु नवीन पाईप लाईन टाकल्यानंतर ज्या जुन्या राहतात त्या पुर्णपणे डिसमेंटल किंवा डिसकनेक्ट करतात का हे लोक? कारण की ब-याचशा ठिकाणी जुन्या पाईपलाईनचे कनेक्शन चालु आहेत आणि नवीन पाईप लाईनचे सुद्धा कनेक्शन चालु आहेत म्हणजेच जे जुन्या पाईप लाईनचे आहेत ते अनरेकार्डडेट आहेत नवीन पाईप लाईनचे रेकार्डडेट आहेत.

**अशोक पाटील :-**

सन्मा. सभापती साहेब ज्या जुन्या सिमेंटच्या पाईप लाईन बदलुन नवीन टाकलेल्या आहेत. माझ्या प्रभागातील ज्या नगरपालिका असताना मी टाकलेल्या आहेत परंतु त्याचे कनेक्शन ट्रान्सफर करुन झाली आहे आणि जुनी लाईन बंद झाली परंतु अजुन जुन्या लाईनचे पाणी येते. महिनाभर पाण्याचा प्रेशर मार खातो मुर्धा गावामध्ये आणि याबाबत मी दशोरे साहेबांकडे तक्रार केलेली आहे. आणि जो मिस्त्री आहे त्याच्याकडे मिरागांवचा सुद्धा चार्ज आहे. श्री.बागुल म्हणुन आहेत आणि मुर्धा ते उत्तनचा सुद्धा त्याच्याकडे चार्ज आहे. मुर्धा ते उत्तन ते अॅवेलेबल नसतो. मी स्वतः तक्रार करतो प्लंबर, व्हॉल्वमन या सगळ्यांची तक्रार आहे आणि तो मिस्त्री कामाला येत नाही व तोंडसुद्धा दाखवत नाही. एक महिनाभर आमच्याकडे हा सतत प्रॉब्लेम चालू आहे. याबाबत मी दशोरे साहेबांना बोललेलो आहे या संदर्भात. तरी त्याबाबत दखल घ्या.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य श्री. अशोक पाटीलजी श्री. बागुल यांनी जर काम व्यवस्थित केले नसेल तर त्यांना लक्ष देण्यास सांगा व तशी ताकीद दया.

**मिलन म्हात्रे :-**

जुन्या पाईपलाईनवरच्या कनेक्शनचे काय?

**मा. सभापती :-**

कनेक्शन ट्रान्सफर झाल्यानंतर जुनी लाईन डेड करुन टाका.

**मिलन म्हात्रे :-**

जुनी लाईन पूर्णपणे बंद करुन टाका. एका बिल्डींगला इकडे दोन कनेक्श्न आणि इकउे दोन कनेक्शन. ती दोन अनरेकॉर्डेड आणि ही रेकॉर्डेड.

**शरद पाटील :-**

सन्मा. सभापती साो. शिफ्टींगचा विषय पुढच्या सभेत आला पाहिजे.

**मिलन म्हात्रे :-**

पाण्याची एक स्थायी सभा आणि एक महासभा अशा दोन सभा झाल्या पाहिजेत.

**मा. सभापती :-**

सदरचा विषय पुढील सभेत घेण्यात येईल.

**हेरल बोर्जिस :-**

प्रकरण क्र. १२० मध्ये माझ्या प्रभागातील पालखाडी येथील एक प्रस्ताव द्यायचा राहिलेला आहे. आसिफ शेख यांचा एक प्रस्ताव होता आणि इतर सदस्यांचासुद्धा प्रस्ताव असु शकेल.

**मा. सभापती :-**

राई गावातील डबका अळी जलवाहिनी टाकणे, राई गावातील महानगरपालिका शाळा येथे अशोक नगर, मुबारक येथे भाईंदर (पश्चिम) अशी एकूण पंधरा

**आसिफ शेख :-**

प्रकरण क्र. १२० जलवाहिनी टाकण्याच्या कामास व इतर कामांना आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देण्यासंदर्भात १ ते १५ कामास दुरुस्तीसह ही सभा मंजुरी देत आहे असा मी ठराव मांडत आहे.

**प्रकरण क्र. १२०:-**

जलवाहिनी टाकणेच्या कामास व इतर कामांना आर्थिक व प्रशासकिय मंजुरी देणे.

**ठराव क्र. १०४ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील उत्तन, चौक, राई, मोर्वा, लाईट हाऊस, डोंगरी येथे सध्या सिमेंटच्या जलवाहिनीतुन पाणी पुरवठा होत आहे. सदरहु जलवाहिन्या ह्या सात ते आठ फुट खोल असून गळती झाल्यास गळती काढणे अडचणीचे होते तसेच उपरोक्त जलवाहिनीस काही ठिकाणी छिद्रे पडली असल्याने नागरिकांना दुषीत पाणी पुरवठा होत असतो. तरी वरील ठिकाणांची सिमेंटची जलवाहिनी बदलून त्या ऐवजी बीडाची जलवाहिनी टाकणे आवश्यक आहे. तसेच पाणी पुरवठा विभागाकडे सदरहु ठिकाणचे १५०० ते १८०० अर्ज नविन नळ जोडणीसाठी आलेले आहेत. नविन जलवाहीनी टाकल्या खेरीज नविन नळ जोडणी मंजुरी करता येत नाही.

भाईंदर पूर्व व पश्चिम भागात काही ठिकाणी जलवाहिनी टाकली नसल्याने काही इमारतींना पाणी पुरवठा दुरच्या जलवाहिनीतून होत आहे व त्यामुळे पाणी पुरवठा कमी दाबाने होत आहे. तरी येथे नविन जलवाहिनी टाकणे आवश्यक आहे.

याकरिता उपरोक्त कामांची अंदाजपत्रके तयार करण्यांत आलेली आहेत.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| १. | भाईंदर पूर्व येथील रामगोपाल सदन ते नर्मदा कुंज, काशिविश्वनाथ मंदिर ते संजय पार्क येथे वितरण जलवाहिनी टाकणे. | रु. ५,७९,०३१/- |
| २. | नवघर रोड येथील वसुंधरा अपार्टमेंट येथे जलवाहिनी टाकणे. | रु. ९,९७,२०८/- |
| ३. | भाईंदर पूर्व येथील हनुमान मंदिर ते झुणका भाकर केंद्र (सायलेंट पार्क जवळील) जुनी सिमेंटची जलवाहिनी बदलून नविन बिडाची जलवाहिनी टाकणे. | रु. ७,२५,९०३/- |

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| ४. | भाईंदर पश्चिम येथील गोम्स स्ट्रीट येथे नविन बिडाची जलवाहिनी टाकणे. | रु. २,२९,६०८/- |
| ५. | मोर्वा गांव येथील सिमेंटची जलवाहिनी बदलून नविन बिडाची जलवाहिनी टकाणे. | रु. ९,६५,७४२/- |
| ६. | डोंगरी बसस्टॉप ते चौक धक्का या भागात सिमेंटची जलवाहिनी बदलून नविन जलवाहिनी टाकणे. | रु. ९,५२,०६७/- |
| ७. | डोंगरी ते दत्त मंदिर या भागातील सिमेंटरची जलवाहिनी बदलून नविन बिडाची जलवाहिनी टाकणे. | रु. ८,८९,०४६/- |
| ८. | डोंगरी गांव येथे जि.आय. जलवाहिनी टाकणे. | रु. ८,२५,८००/- |
| ९. | चौक गांव येथे जि.आय. जलवाहिनी टाकणे. | रु. ९,४६,११५/- |
| १०. | नया नगर, मस्जिद गल्ली, मांडवी पाडा येथे वितरण जलवाहिनी टाकणेच्या कामास कार्यात्तर मंजुरी देणे. | रु. १,८९,३४१/- |
| ११. | भाईंदर पूर्व व पश्चिम भागात बीडाऐवजी पोलादी बेंड व टी बसविणे. | रु. १,५४,९५३/- |
| १२. | राई गांव येथील नळ आळी व डब आळी येथे जलवाहिनी टाकणे. | रु. ९,९९,१७५/- |
| १३. | राई गांव येथील मनपा प्राथमिक शाळा ते ल्युब्रीकेंम कंपनीपर्यंत जलवाहिनी टाकणे. | रु. ९,८९,१९७/- |
| १४. | पोलिस स्टेशन ते मुबारक कॉम्प्लेक्स व अशोक नगर येथे बिडाची जलवाहिनी टाकणे. | रु. ८,१०,५२१/- |

वरील कामांच्या अंदाजपत्रकांना मा. स्थायी समितीची दुरुस्तीसह आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. आसिफ शेख.          अनुमोदन :- श्री. हॅरल बोर्जिस.**
**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्रभारी सचिव यांनी प्रकरण १२१ चे वाचन केले.)

**मिलन म्हात्रे :-**

सभापती महोदय प्रकरण १२१ मध्ये जो ६ वा क्रमांक आहे, तर मागच्या वेळेस अशी आपली चर्चा झाली होती. बी.एस.इ.एस. च्या संदर्भात आता गणेशोत्सवास लवकरच सुरुवात होणार आहे. तर बी.एस.इ.एस. तर्फे जर केबल आपल्याला धक्क्यापर्यंत टाकुन मिळाली कारण एक दीड वर्षापासुन पत्र व्यवहार माझा हया विषयावर आहे. सर्वे झाला सगळ काही झालेले आहे. गेल्या गणपतीला आम्हाला काही केबल टाकुन मिळाली नाही. या वेळेला जर आपल्याला केबल टाकुन मिळाली तर जनरेटरचा जो आपला खर्च आहे त्या खर्चामध्ये आपल्याला दोन्ही ठिकाणी भाईंदर ईस्ट, वेस्ट केबलचा खर्च त्याच्यातुन निघण्याची शक्यता आहे. आणि तो लॉंग टाईम असणार आहे. त्याकरिता गणेशोत्सवाला अजुन १५ ते २० दिवस आहेत. जर युद्धपातळीवरती बी.एस.इ.एस.ला आपण विनंती करून जर ते आपण केलं तर कायमची आपली ती सोय होऊन जाईल. माझी अशी आपल्यास विनंती आहे की, सहावा विषय जो जनरेटरचा आहे त्याबद्दलचा आपण जरा फेरविचार करावा आणखीन केबलच काम युद्धपातळीवर तयार करून दोन्ही साईडला बी.एस.इ.एस.च्या अधिका-यांची खास सभा आपण बोलवावी.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य म्हात्रेजीनी जो प्रस्ताव आणलेला आहे त्याबद्दल जनरेटरचा विचार करु नका जनरेटर ठेवुन द्या आणि युद्धपातळीवर हे काम करुन घ्या. झाल तर वेळेवर आपल्याला रद्द करता येईल.

**दिपक खांबीत :-**

परशुराम नामदेव म्हात्रे शिवशक्ती नगर मराठी शाळेच्या मागे नवघर गाव यांनी आपल्याला सामानाची यादी दिलेली आहे.

**दिनेश नलावडे :-**

चौपाटीचा विषय आलेला आहे. आपणास कल्पना असेल की आठ दिवसापूर्वी आपल्या चौपाटीवरती पाच सहा मुले चौपाटीवर गेली त्या पैकी एक मुलगा पाण्यामध्ये गेला या मुलाची अजुनपर्यंत बॉडी मिळालेली नाही. आज १० दिवस झाले. आठ दहा दिवस झाले याच्या अगोदर पण असेच प्रकार याच खाडीवर झालेले आहेत. ते तिसरे-चौथे प्रकरण आहे.

**मा. सभापती :-**

आपण वॉचमन नियुक्त करावे. गणपतीचा सीजनपण आहे वनखात्याची लोक असतात साफसफाईचे मुकादम असतात. दोन तीन माणसाची चौपाटीवर नेमणूक करून घ्या. पुढचा विषय घ्या.

**नितीन ठाकुर :-**

साहेब, भाईंदर पश्चिमला कुठे कुठे गणपती विर्सजन होणार आहे.

**मा. सभापती :-**

आता आपण घाट बांधणार आहोत. घाटाच काम सुरु होणार आहे. तात्पुरता प्रिकॉशन वॉचमन सुरु करूया आपण.

**मिलन म्हात्रे :-**

वॉचमन नसला मग

**मा. सभापती :-**

अस नाही, जर तर चा प्रश्न येतच नाही.

**दिनेश नलावडे :-**

त्या दिवशी प्राइवेट जागेसाठी सिक्यूरिटी गार्ड होते. तो त्या ठिकाणी त्या मुलांना वाचवू शकला नाही. तो जर त्या ठिकाणी गार्ड होता त्याने जर इतर लोकांना आवाज दिला असता बाजूला काही लोक बसलेले होते त्यांनी प्रयत्न केला असता. बाजुला असलेल्या कोळी लोकांशी आम्ही चर्चा केलेली आहे तरी आपण त्यांची नेमणूक त्या ठिकाणी करावी. नगरपालिकेतर्फे वॉचमेनची नेमणूक करावी.

**मिलन म्हात्रे :-**

लाईफ गार्डची नेमणूक करावी.

**नितीन ठाकुर :-**

भाईंदर पश्चिम येथे राव तलाव जे जुनं आहे ते आता व्यवस्थित झालेल आहे सुधारणा केली नगरपालिकेने त्याच्यामध्ये या वर्षी ओपन करा लोकांकरिता आणि गणपती विसर्जन तिथेच करावे आणि आपल्या महापौराच्या हस्ते ओपनिंग आठ दिवसामध्ये करून टाकावे.

**मिलन म्हात्रे :-**

शाळा तसेच स्मशानभूमी पण आहे. तिथे पण वॉचमेन नाही.

**मा. सभापती :-**

जेवढे वॉचमेन आहेत. त्यांची यादी घेऊन प्रत्येक ठिकाणची वॉचमन त्याच्यातर्फे देऊन टाका.

**मिलन म्हात्रे :-**

सभापती साहेब, हयाच्यामध्ये हा जो विषय आला आहे. त्याच्याकरता बी.एम.सी, टी.एम.सी.ला जे निर्माल्य गोळा करण्याकरता स्पेशल असे कुंभ बनवतात फायबरचे आता ठाण्याला जे बनवले आहेत ते कायम स्वरुपी आहेत. तलावाच्या बाजुलाच आहेत. फायबरचे जर चांगल्या गेजचे जर बनवले तर तुम्ही हौद बनवता त्याला खर्च होतोच. ईस्ट वेस्टला जर फायबरचे चांगल्या गेजचे बनवलेले मोठे कुंभ असते तर ते त्या निर्माल्याकरिता त्यांचा उपयोग चांगला होईल आणि दिसायला जरा डेकोरेशन चांगले दिसेल.

**मा. सभापती :-**

सुचना चांगली आहे.

**मा. केळेकर सो. (उप आयुक्त):-**

निर्माल्य कलश हयाबाबत पर्यावरण विभागाने आपल्याला सुचना दिल्याच आहेत. प्रत्येक तलावामध्ये निर्माल्य टाकु नये या संबंधी शासनाचे आदेश आपल्याला प्राप्त झालेले आहेत पण त्याप्रमाणे समुद्राच्या किनाऱ्यावर आणि तलावाच्या जवळ निर्माल्य कलश निर्मितीचा प्रश्न आहे.

**मिलन म्हात्रे :-**

कलश हौद नाही कारण ते हौदातल सगळं वाहून परत जाते.

**मा. केळेकर सो. (उप आयुक्त):-**

निर्माल्य कलशच ठेवायच ना.

**मा. सभापती :-**

पुढचा विषय घ्या.

**अनंत पाटील :-**

राईच्या गणेश विसर्जनाच्या संदर्भात जी पूर्वीची चौपाटी होती शिवनेरीच्या पाठीमागे परंतु तिथे तिवरीची झाडे वाढल्यामुळे संपूर्ण तो पूर्वीचा रस्ता होता तो बंद झालेला आहे. यासाठी नगरपालिकेने एखादा ठेके टाईप रस्ता बनवावा जेणेकरुन आता विसर्जनाची एवढी कुचंबणा होणार आहे की आता राईचे गणपती उत्तनसारख्या ठिकाणी किंवा भाईंदरच्या धक्क्यापर्यंत पोहोचवण्याची पाळी आता आलेली आहे. तरी महानगरपालिकेने गणपती विसर्जनासाठी व्यवस्था करावी. जेणेकरून गणपती विसर्जनाचा घाट आपल्याला विसर्जनाकरिता उपयोगात येईल आणि दुसरी गोष्ट राई येथील जे राम तलाव आहे त्या तलावाच्या कंपाऊंड ग्रीलचे टेंडर जे दिले होते ते एवढे निकृष्ट दर्जाचे होते की प्रत्येक वेळेला ज्या जाळ्या असतात त्या आपोआप पडतात. यामुळे विसर्जनाच्या वेळेला कदाचित अपघात होण्याची शक्यता आहे. आताच दोन जाळ्या पडलेल्या आहेत जिथे लोकांचा सहभाग येतो तिथे चांगल्या प्रकारे काम करण्यात यावे आणि सामन्यामध्ये बातमी येऊन गेली जे मोर्वाला जे काय टेंडर आपण गटाराच दिल होतं ते गटाराच काम पावसाच्या अगोदर अर्धवट स्वरुपाच आहे. ढिगारा साचलेला आहे संपूर्णपणे अशी बातमी चित्रासहित सामना पेपरमध्ये आलेली आहे. याचा ठेकेदार आहे तरी कोण याची आपण चौकशी करावी. आणि त्याचा खुलासा करावा.

**मा. सभापती :-**

खुलासा तुम्हाला नंतर देण्यात येईल.

**प्रकरण क्र. १२१:-**

निविदांना मंजुरी देणे.

**ठराव क्र. १०५ :-**

दि. ११/०७/२००३ रोजीच्या दैनिक सकाळ मध्ये प्रसिद्ध झालेल्या जाहिर निविदा सुचनेनुसार मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत सर्वधर्मिय उत्सवांतर्ग श्री. गणेश विसर्जन, दुर्गामाता विसर्जन, गणगौर, कार्तिक पोर्णिमा, ईद, वेलंकनी उत्सव, शालेय कार्यक्रम व इतर शासकीय मोहिमेंतर्गत महानगरपालिकेच्या आदेशानुसार लाईट्स, मंडप, स्टेज, रेलिंग, टेबल, खुर्च्या, गेट व इतर व्यवस्था करणे कामी खालील ठेकेदारांनी मुदतीत निविदा सादर केलेल्या आहेत. सदर कामांकरिता सन २००३-०४ या वर्षाच्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात पुरेशी तरतुद उपलब्ध आहे.

१) भाईंदर (पश्चिम) व मुर्धा उत्तन विभाग (रु. १०.०० लक्ष)

| अ.क्र. | तपशिल | ठेकेदाराचे नांव | | |
|---|---|---|---|---|
| | | मे. द्वारका इलेक्ट्रीकल्स | नामदेव पवार | धारावी डेकोरेटर्स |
| १. | पुष्पवृष्टी करिता स्टेज (१६' ०'' फुट) | ३५०० चौ. फुट | ४००० चौ. फुट | ३००० चौ. फुट |
| २. | मंडप वॉटर प्रुफ | १७ चौ. फुट | १८ चौ. फुट | १६ चौ. फुट |
| ३. | लहान स्टेज | १७ चौ. फुट | १८ चौ. फुट | १६ चौ. फुट |
| ४. | खुर्ची | १२ नग | १५ नग | ११ नग |
| ५. | टेबल | ५० नग | ४० नग | ३५ नग |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६. | जनरेटर | १२००० नग | १०००० नग | ८५०० नग |
| ७. | गेट | ६००० नग | ५५०० नग | ५००० नग |
| ८. | लाकडे रेलिंग | ४० रनिंग फुट | ३५ रनिंग फुट | ३२ रनिंग फुट |
| ९. | स्पिकर सेट | ३००० नग | ३१०० नग | २५०० नग |
| १०. | हॅलोजन | १०० नग | ९५ नग | ९० नग |
| ११. | एच.एम. लाईट | ५८०० नग | ५५०० नग | ५००० नग |
| १२. | पार्टीशन / पडदे | २५ रनिंग फुट | २० रनिंग फुट | १५ रनिंग फुट |
| १३. | कारपेट | २ चौ. फुट | २ चौ. फुट | १ चौ. फुट |
| १४. | स्टॅन्ड फॅन | ३५० नग | ३५० नग | ३२५ नग |
| १५. | गेट लॅम्प (डे लाईट) | ४९०० नग | ४७०० नग | ४५०० नग |
| १६. | विसर्जन ठिकाणी बोटींगची व्यवस्था करणे | ११५०० नग | ११००० नग | १०५०० नग |

२) भाईंदर (पूर्व) मिरा रोड व पेणकरपाडा ते चेना विभाग (रु. १०.०० लक्ष)

| **अ.क्र.** | **तपशिल** | **ठेकेदाराचे नांव** | | |
|---|---|---|---|---|
| | | **धारावी डेकोरेटर्स** | **मे. द्वारका इलेक्ट्रीकल्स** | **नामदेव पवार** |
| १. | पुष्पवृष्टी करिता स्टेज (१६' ०'' फुट) | ३००० चौ. फुट | ३५०० चौ. फुट | ४००० चौ. फुट |
| २. | मंडप वॉटर प्रुफ | १६ चौ. फुट | १७ चौ. फुट | १८ चौ. फुट |
| ३. | लहान स्टेज | १६ चौ. फुट | १७ चौ. फुट | १८ चौ. फुट |
| ४. | खुर्ची | ११ नग | १२ नग | १५ नग |
| ५. | टेबल | ३५ नग | ५० नग | ४० नग |
| ६. | जनरेटर | ८५०० नग | १२००० नग | १०००० नग |
| ७. | गेट | ५००० नग | ६००० नग | ५५०० नग |
| ८. | लाकडे रेलिंग | ३२ रनिंग फुट | ४० रनिंग फुट | ३५ रनिंग फुट |
| ९. | स्पिकर सेट | २५०० नग | ३००० नग | ३१०० नग |
| १०. | हॅलोजन | ९० नग | १०० नग | ९५ नग |
| ११. | एच.एम. लाईट | ५००० नग | ५८०० नग | ५५०० नग |
| १२. | पार्टीशन / पडदे | १५ रनिंग फुट | २५ रनिंग फुट | २० रनिंग फुट |
| १३. | कारपेट | १ चौ. फुट | २ चौ. फुट | २ चौ. फुट |
| १४. | स्टॅन्ड फॅन | ३२५ नग | ३५० नग | ३५० नग |
| १५. | गेट लॅम्प (डे लाईट) | ४५०० नग | ४९०० नग | ४७०० नग |
| १६. | विसर्जन ठिकाणी बोटींगची व्यवस्था करणे | १०५०० नग | ११५०० नग | ११००० नग |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता ठेकेदार मे. धारावी डेकोरेटर्स यांनी सादर केलेली निविदा सर्वात कमी दराची असून चालू बाजार भावाात पाहता वाजवी आहे. सदर निविदांना मंजुरी देण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. आसिफ शेख.** **अनुमोदन :- श्री. दिनेश नलावडे.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्रभारी सचिवानी प्रकरण क्र. १२२ चे वाचन केले)

**धनराज अग्रवाल :-**

सभापती महोदय पिछले सालमे ये जो प्रस्ताव आया था उस मे व्यापारीयो की बहुत नाराजी थी। जाहिरात कर प्रशासनने किसी एक एजन्सी को दिया था। लगाने के लिये उसका मोजमाप करने के लिये। उसने मोजमाप ऐसी की उसने दुकानो का पुरा कपाट मोजमाप किया बोर्ड का कुछ भी मोजमाप नही किया। और मतलब किसी व्यापारीने वो कर भरा नही। और इतना कर लगा दिया उसके लिये फिरसे प्रस्ताव हम लोग लाये थे। ये प्रस्ताव ही गलत है। उनको शायद मेरे ख्यालसे ग्यारह लाख या एकीस लाख कुछ मेहनताना दिया था वो भी फोकट गया। इसका मतलब भी नही निकला। ये जो अठ्ठाअस्सी लाख उन्नीस हजार आप बोलते उसका टुटी हो रहा है मगर बजेट पास करते टाईम मैने खुदने बोला था राहिदासजीने बोला था की ये जो बजेट पास कर रहे है उसमे प्रशासकीय ठरावमे कुछ फेरबदल करने का अपने को उसमे तीनो प्रस्ताव है। एक जाहिरात कर एक अपना एनओसी का और एक पानी का। जो अभी आप लानेवाले तीनो मे से एक आप लाये उसमे जो जुना आपने लिखा वो नये तरीके से करना है लेकीन अब ८८ लाख १९ हजार का जबाबदार कौन? अगर उसने माप ही चुकीका दिया है समझो पहिले कॉन्ट्रॅक्टाने चुकी का माप दिया उसका जबाबदार हम क्यो?

**मा. केळकर सो.(उप आयुक्त) :-**

सन्मा. सदस्य श्री. धनराजजी यांनी सुचित केल्याप्रमाणे याबाबतची आम्ही संपूर्ण माहिती काढली पुर्वी जो टॅक्स लावण्यात आलेला होता व्यापाऱ्यांनी जो शोकेस केल्यात त्याला सुद्धा टॅक्स लावण्यात आला होता. समोर वेदर बोर्ड काढले, वेदर शेड काढले त्यांना सुद्धा टॅक्स लावण्यात आला होता. शासनाने दिनांक १९ जुन २००३ रोजी या संबंधीचे नियम अंतीमरित्या फायनल केलेले आहेत. त्यामध्ये वेदर शेड किंवा शोकेस याला जाहिरात कर लागु नाहीत. त्यामुळे ही तुट आपणाला येणार आहे. या बाकी बोर्डावर जी आहे त्याप्रमाणे राहिल. परंतु वेदर शेड आणि शोकेस यातुन वगळण्यात आले आहे. हे मोठ्या प्रमाणात याच्यामध्ये त्या आकारण्यात आले होत. त्यामुळे ती ८८ लाखाच्या जवळपास तुट कमी होणार आहे वेदर शेड जर सोडले तर

**धनराज अग्रवाल :-**

प्रशासनाची चुक होती. त्यांनी भरमसाठ टॅक्स लावले. गलत मोजमापी आपल्याला दिली. त्याचे जबाबदार स्थायी समिती कशी काय?

**रिटा शहा :-**

मला एक विचारायच आहे हे विचारतात ते बरोबर आहे पण आपण जेव्हा ती निविदा मंजुर केली. जेव्हा जाहिर केल्यावर तेव्हा आपण त्याला सांगितल होत की शोकेसला पण लाव की त्या निविदामध्ये आपण अशा काही अटी शर्ती लावली नव्हती. तर त्याची चुक आहे. त्यांनी लावले ते आपण कशाला सहन करायच ते.

**धनराज अग्रवाल :-**

मी तर सांगतो जे माणसाने चुकी मोजमाप केलेली आहे दिलेली आहे त्याच्याकडुन आपले दिलेले पैसे वसुल करा. नगरपालिकाने त्याला ११ लाख दिले २१ लाख दिले मला पूर्णपणे आठवत नाही.

**मा. सभापती :-**

त्याची जी ॲग्रीमेंट केली आहे त्याची तुम्ही तिथे दाखवा.

**दिपक खांबीत :-**

ठाणे महानगरपालिकेत ज्याप्रमाणे सर्वे केला होता त्याप्रमाणे आपण सर्वे केला आणि शोकेसची मापे आपण घेतली होती. तर त्यांनी पण कॅन्सल केले आणि गव्हर्नमेंटचा तसा जी.आर. पण आलेला आहे.

**धनराज अग्रवाल :-**

त्या शोकेसचे माप आतमध्ये कोणी घेत नाही. बाहेर जे शोकस असेल त्याचे माप घेतले पाहिजे. त्यांनी पूर्ण आतमध्ये माप घेतली होती, ही त्याची चुकी होती.

**रिटा शहा :-**

निविदा दाखवा ना तुमची निविदा कुठे आहे ती वाचुन दाखवा ना तुम्ही. काय काढली होती.

**मा. सभापती :-**

याची पूर्ण माहिती आणून दया आणि विषय पुढे घ्या.

**रिटा शहा :-**

पुढे घ्या बरोबर आहे.

**मिलन म्हात्रे :-**

सभापती महोदय चर्चा पुढे होईल आणि आजच मरण उद्या वर ढकलतोय.

**मा. सभापती :-**

याची संपुर्ण विस्तृत माहिती आणतो ना. ॲग्रीमेंट काय कंडिशन काय चर्चा नको.

**मिलन म्हात्रे :-**

पुढचा विषय घेऊन येताना पहिली गोष्ट जे आपण शासनाच्या नगरविकास विभागाचे १९/०६/२००३ चे प्रसिद्धी राजपत्र मा. केळकर साहेब राजपत्राची कॉपी आम्हाला हवी. कारण आम्हाला याच्यावर निर्णय घ्यायचा आहे. राजपत्र आम्हाला मिळालेले नाही. जो कर तुम्ही लावलात त्याचे व्हॅल्युएशन दरपत्रक सुद्धा आम्हाला मिळालेले नव्हते ते दर तुम्ही पाठीमागे लावलेत सभापती साहेब हा विषय तेवढा सोपा नाही आहे. माझी पुर्ण गोष्ट ऐकुन घ्या. भाईंदरमध्ये व्यापारी सुद्धा प्रामाणिक नाही आहेत मी सुद्धा व्यापारी आहे पण जेव्हा हा सर्व्हे झाला तेव्हा काही लोकांनी इन्फरमेशन पाठविली की तुमच्या ऑफीसचा आता सर्व्हे होणार आहे. तुमच्या गोडाऊनचा सर्व्हे होणार आहे. तुमच्या शोरुमचा होणार आहे. पण अशा बिलंदर व्यापाऱ्यांनी स्वतःची होर्डिंग्ज काढुन ठेवली. लक्षात ठेवा मी मार्केटमध्ये फिरतो. मी पायी फिरणारा माणुस आहे. होर्डिंग्ज काढुन ठेवली खाली त्या दुकानाचे सर्वे झाले. नील दाखवल आणि परत होर्डिंग्ज चढली. त्याचा रिसर्व्हे होणार आहे का? रि-सर्व्हे करायचा का?

**मा. सभापती :-**

तुम्ही सुचना मांडली आता त्याची चर्चा कशाला पाहिजे आता.

**मिलन म्हात्रे :-**

ह्याच्यातील ही माहिती पाहिली आम्हाला द्या. नंतर हा विषय येऊ द्या. म्हणजे वाद कमी होईल आणि निर्णय लवकर होईल. जी.आर. पुढच्या मिटिंगला आम्हाला द्या. दरपत्रकाप्रमाणे जी दरसुचि मंजुर झाली ना, ती आम्हाला द्या आणि त्याला आपल्या सभागृहाने मंजुरी दिलेली आहे.

**धनराज अग्रवाल :-**

राजपत्रानुसार कॅन्सल झालाय मग सुची परत कशाला पाहिजे? केली असेल पण तरी हा कॅन्सल झालेला विषय आहे. याच्या त्रुटीचा जबाबदार कोण?

**शरद पाटील :-**

माझी एक सुचना आहे ज्या लोकांनी भरले त्यांचे काय?

**मिलन म्हात्रे :-**

कॉप्लिकेशनचे मॅटर आले ते डिसाइड करायला अजून पर्यंत आपल्या महानगरपालिकेत एक ही अधिकारी नाही. याच्यावर डिसीजन घेणार कोण? ह्यावरती काहीतरी रुलिंग द्या.

**मा. सभापती :-**

पुढच्या सभेला हा विषय घेऊ आणि तो करुन ठेऊ.

**प्रकरण क्र. १२२ :-**

जाहिरात कराबाबत.

(मा. सभापतींच्या आदेशानुसार सदर विषय पुढील सभेत घेण्याचे ठरविण्यांत आले.)

(प्रभारी सचिवानी प्रकरण क्रमांक १२३ चे वाचन केले)

**शरद पाटील :-**

सभापती महोदय, या ठेकेदाराला निविदा दयायच्या आहेत तर पाच विभागात जी झाडे लावायची ती कुठे कुठे लावायची आणि आता आपण जो वृक्ष दिंडीचे कार्यक्रम केले आणि वृक्ष लावली ते पण ते वाढवणार आहेत आणि मग ती आपण लावली ती काढुन दुसरी लावणार का तिथे? मग त्याला कुठच्या जागेवर लावतील.

**गोविंद परब :-**

विविध झाडे लावायची आहेत. त्यांना रोडची नाव दिलेली आहेत. त्यांना जे झाड लावणार त्यांना वेगवेगळे नंबर देणार. एका प्रभागात उदा. मिरा रोड दिली तर १ ते ३००० झाडांना नंबर देणार आणि तसे रजिस्टर प्रत्येक विभागवार ठेवणार.

**शरद पाटील :-**

किती झाड लावायला देणार आहोत आपण?

**गोविंद परब :-**

प्रत्येक विभागाला ३००० आहेत.

**शरद पाटील :-**

प्रत्येक प्रभागात प्रत्येक विभागामध्ये ३००० झाड म्हणजे पाच विभागात १५ हजार झाडे.

**मिलन म्हात्रे :-**

सभापती महोदय या विषयामध्ये आपल्या नैसर्गिक विभागाची जी जागा आहे ती खार जमीन जास्त आहे. कुठलीही शेती करताना शेती तज्ञ त्या जमिनीचा अहवाल मागवतात त्याची चाचणी करतात. आपल्या खार जमिनीवरती जी झाड जगणारी आहेत आणि महत्वाचे म्हणजे भरपूर उघडी जागा सुद्धा आहे. आपल्याकडे जी मिठागरे आहेत अशी शेकडो एकर जागा उघडली आहे. जर तिकडे खार जमिनीची झाडे लावली तर ही मोकळी जागा आहे. आगरामध्ये भेंडीची झाडे वगैरे जगतात त्या पद्धतीचे जर वृक्षारोपण आपण केले तर बाकीच्या शहरामध्ये जी मोकळी जागा दिसते आपल्याला तिकडेसुद्धा एका प्रकारचे वृक्षारोपण झाल्यासारखे होईल आणि भेंडीच्या झाडाला पाणी टाकायला लागते अशातला भाग नाही. तर त्याचा जर आपण आहेत त्या झाडाची पिसेस करुन ते जर आपण लावले तर तो जर आपण विचार करावा. बांध्यावर वगैरे जे आगराचे जे बांधे आहेत त्यावर करावे. हा विषय जरा उशीरा आलेला आहे. तो मे महिन्यात यायला पाहिजे होता. आणि हे सर्व होत असताना डि.एम.सी. साहेब हा प्रयोग पहिला एकदा महानगरपालिकेमध्ये आपण ॲडॉप केला होता त्याला रिसपॉन्स चांगला मिळाला नाही. तो फेल गेला त्याकरीता करत असताना आपले इकडे वृक्षप्राधिकरण सुद्धा बनणार आहे तर सायमलटेनीअसली आपल्या महापालिकेतर्फेसुध्दा आपण एक नगरपालिकेतर्फे जे पूर्वी आपण रोप तयार करायचे ते चालू ठेवावे कारण ते सुद्धा फेल गेलेतर त्याचा सेट बॅक ३ वर्ष आपल्याला मिळाला. सुदैवान वृक्षारोपण झाले नाही हा आपला तोटा आहे. शेवटी आम्ही नगरसेवक आहोत. आम्हाला लोक विचारतात. जे सुजाण नागरिक आहेत ते विचारतात की आमचा असा असा एवढा एक टक्का वृक्षकर गेला तर किती झाडं लावली तुम्ही. आपल्या ज्या टॅक्सच्या हिशेबाने एक टक्का वृक्षकर आहे. नागरिकांना आपण देणे लागतो इकडच्या त्याच्या बेनिफिटमध्ये आऊटपुट आपला काहीच निघत नाही. तर त्या करीता आपलं जे वनखाते आहे, हे सगळ तुम्ही जर बी.ओ.डी. तत्वावर दिले तर वनखातेसुद्धा बी.ओ.डी. तत्वावर द्यायला लागेल तुम्हाला. इकडे जो भविष्यात कोण जो डि.एम.सी. येईल त्यांना देखील तुम्हाला बी.ओ.डी.मध्ये बसवायला लागेल. तर त्याकरिता आपले जे डिपार्टमेंट आहे. आता जसे तुमचे नवीन नियमानुसार जे वनऔषधी वगैरे डेवलप करणे हे आपल्या प्रोजेक्ट मध्ये आहे ते आपण केल पाहिजे त्याच्याकरिता ते जे प्रोजेक्ट आहे ते आपल्याकडुन आपण चालवावेत. मी सांगितल्यानुसार शहराच्या लगत बाजुला बरीचशी मोकळी जागा आहे तिकडे त्या जमिनीचे नमुने घेऊन तिथे कुठली झाडं आपल्याला रोपण करता येतील ते आणि शहरातले रस्ते ह्या सगळ्याचा विचार करा पण नगरपालिकेच्या वनविभागातर्फे सुद्धा वृक्षारोपणच काम किंवा वृक्ष वाढविणे, संवर्धन करणे हे चालु ठेवले पाहिजे.

**अशोक पाटील :-**

दरवर्षी या वन विभागातर्फे शहराचं सौंदर्य वाढविण्यासाठी वृक्षारोपण वृक्षसंवर्धन याच्यासाठी लाखो रुपये खर्च करतो. परंतु खरोखर ते फलरुप होते का? शहराला त्याचा फायदा होतो का? आणि हया सर्वांनी जे आपण लाखो रुपये खर्च करून वृक्षारोपण करणार त्यांचे संवर्धन करणार, याच्यासाठी आपल्या वनविभागाकडे असा एखादा वनखात्याचा तज्ञ आहे का? जस आरोग्यामध्ये आपण डॉक्टरसाहेबांची नियुक्ती केली तस वनविभागाकडे तज्ञ आहे का? आपल्याकडे तरतुद आहे का? करता येईल का?

**मा. सभापती :-**

सन्मा. अशोक पाटिलजी यांनी चांगली सुचना मांडली आपण. यापूर्वी या ठिकाणी महासभेमध्ये वृक्षप्राधिकरण समिती स्थापन केलेली आहे आणि त्या समितीमध्ये तसा एक तज्ञ असणार आहे. आणि त्या अनुषंगाने सर्व काम होणार आहे.

**रिटा शहा :-**

मा. कमिशनर साहेबांच्या दालनात मी जेव्हा बसलेली होती तेव्हा ते हिंन्दुस्थान कंपनीचे लोक आलेले होते. आणि त्यांचा काहीतरी प्रस्ताव होता. तेव्हा साहेब मला बोलले की, मॅडम त्यांनी प्रस्ताव चांगला आणलेला आहे. आपल्या शहराचे पैसे पण वाचतील आणि आपल्याला झाडे पण लावून देणार आहेत. असा काहीतरी प्रस्ताव होता. तरी त्याचा त्याच्यामध्ये काही उल्लेख नाही.

**मा. केळेकर सो. (उप आयुक्त):-**

एच.पी.सी.एल.ने ८००० झाडे आपल्याला दिलेली आहेत. आणि ती लावण्याचे काम सुरु आहे. शहरामध्ये ग्रुप प्लान्टेशन सुरु आहे. उद्यान विकसित होऊ शकते. त्यासाठी आपण फॉरेस्ट डेव्हपमेंट कार्पोरेशन ह्याचा सल्ला घेऊन लवकरात लवकर तिथे ही मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करण्याचा प्रयत्न करु.

**दिनेश नलावडे :-**

सभापती साहेब, एच.पी.सी.एल. कंपनीचे झाडे जगवा आणि झाडे लावा याबाबत फक्त आपल्याला त्या कंपनीची ॲडवर्टाईज करायची आहे का?

**मा. केळेकर सो. (उप आयुक्त):-**

त्यांनी आपल्याला फक्त आठ हजार झाडे आणून दिलेली आहेत आणि ती झाडे लावण्याचे काम आपल्याला करायचे आहे.

**धनराज अग्रवाल :-**

सभापती साहेब आपण जो टेंडर काढलेला आहे की, पंधराशे चाळीस, पंधराशे सत्तेचाळीस त्याच्यात कंडीशन काय आहे? त्यांनी पिंजरा, माती वगैरे द्यायचे का? ते सर्व आपणच देणार. त्याच्यात पेमेन्ट आपण कसे करणार?

**शरद पाटील :-**

जी झाडे मरतील त्यांचे पैसे कापून घेणार का?

**धनराज अग्रवाल :-**

पहिल्या वर्षी तीस टक्के, दुसऱ्या वर्षी तीस टक्के आणि तिसऱ्या वर्षी चाळीस टक्के. तिसऱ्या वर्षी ते झाड गेले त्याचे पैसे कसे देणार आपण?

**दिपक खांबीत :-**

वीस टक्के झाडे नर्सरीमध्ये तयार करायची आणि ती झाडेही त्याबरोबर वाढणार. मग ते त्यालापण लावता येईल. त्याच्यात अटीशर्ती येतात.

**धनराज अग्रवाल :-**

ह्याच्यात आपली एकपण अटीशर्ती आलेली नाही.

**शरद पाटील :-**

गोषवाऱ्यामध्ये आपण अटीशर्ती का देत नाही?

**मा. सभापती :-**

आपल्या कंडीशन आपल्याला समजायला पाहिजे. तिसऱ्या वर्षी झाड लावले तरी पण ते चौथ्या वर्षी झाड मरु शकेल.

**धनराज अग्रवाल :-**

आपण असे बोलता म्हणजे त्यांची जबाबदारी संपेल.

**मा. सभापती :-**

आपल्याला तिसऱ्या वर्षापर्यंत झाड चांगले राहिले पाहिजे आणि पर्यायी तसे सांगितले आहे. कंडीशनप्रमाणे त्यांच्याकडे नर्सरीमध्ये झाडे ठेवणार असतील तर ती झाडे आपल्याला लावता येतील. समजा ते झाड एका-दुसऱ्या वर्षी जगले आणि तिसऱ्या वर्षी नैसर्गिक आपत्ती आली तरच जाऊ शकते.

**शरद पाटील :-**

शेवटला त्यांनी तोसुद्धा विचार केला. ते झाड मेले कि दुसरे लावायला पाहिजे म्हणून आपण टिपणीत आम्हांला सविस्तर माहिती दिली असती तर चांगले झाले असते. असे दिले नाही म्हणूनच आम्हांला विचारावे लागते.

**मिलन म्हात्रे :-**

सभापती साहेब हा एवढा मोठा विषय आहे. त्यात सविस्तर टिपणी न दिल्याशिवाय विषय आलेला आहे.

**रिटा शहा :-**

एच.पी.सी.एल. आपल्याला झाडे देणार आहेत ना?

**दिनेश नलावडे :-**

अटीशर्ती काय आहेत ते द्यायला पाहिजे होते.

**मा. केळेकर सो. (उप आयुक्त):-**

एच.पी.सी.एल.चे अधिकारी आपल्याकडे आलेले आहेत. त्यांनी गावाचा सर्वे केला आणि त्यांनी त्या तऱ्हेचे आपल्याकडे ८००० झाडे पुरवठा केली. त्यानंतर आपण त्यांना रिक्वेस्ट केली होती की, एच.पी.सी.एल.नेच प्लान्टेशन करावे. परंतु त्यांनी ह्यावर्षी असे सांगितले आहे की, आम्ही आठ हजार झाडे तुमच्याकडे देतो. तुम्ही ती झाडे लावावी. ह्यावेळेला त्यांच्याकडे पिंजरे वगैरे उपलब्ध नाहीत. पुढच्या वर्षी ते आपल्याला अधिक जास्त मदत करतील. ह्यावर्षी त्यांनी बाकी प्रस्ताव मान्य केला नाही पण झाडे देण्याचा प्रस्ताव त्यांनी मान्य केला आहे.

**रिटा शहा :-**

ह्यावर्षी त्यांनी ८००० झाडें आपल्याला दिली का?

**मा. केळेकर सो. (उप आयुक्त):-**

होय दिली.

**रिटा शहा :-**

झाडे लावण्याचे काम सुरु झाले आहे का? व किती झाडे लावून झाली आहेत?

**गोविंद परब :-**

झाडे लावण्याचे काम चालू आहे. ग्रुप प्लान्टेशन होत आहे.

**रिटा शहा :-**

ग्रूप प्लान्टेशन सुरु आहे का?

**गोविंद परब :-**

ग्रुप प्लान्टेशनसाठी पिंजरे नाही आहेत. उत्तन साईडला काम चालू आहे.

**रिटा शहा :-**

उत्तन साईटला नेमके कुठे काम चालू आहे?

**गोविंद परब :-**

डोंगरी वरती चवळी वगैरे येथे.

**रिटा शहा :-**

तुम्ही नेमके सांगा झाडे कुठे लावली.

**गोविंद परब :-**

परवा चवळीला झाडे लावली.

**रिटा शहा :-**

तुम्ही स्पॉट सांगा. नक्की झाडे कुठे लावली?

**गोविंद परब :-**

नक्की स्पॉट सांगता येणार नाही. जंगली पट्टा आहे तेथे झाडे लावली.

**रिटा शहा :-**

हे बघा आपले असे उत्तर चालणार नाही. तुम्ही नक्की सांगा कुठे आणि किती झाडे लावली आहेत. तुम्ही स्पॉट दिला असेल ना. मोदी पटेल, साईबाबा गार्डन, हनुमान गार्डन ह्या जागेला लावा असे आपण दिले असेल, असे काही तरी असेलच ना तुमच्याकडे?

**गोविंद परब :-**

जिकडे मोकळी जागा आहे तिथे संपूर्ण चौक पासून झाडे लावणार आहेत.

**रिटा शहा :-**

आपल्याला कुठेही मोकळी जागा मिळेल आणि तिथे आपण झाडे लावणार आहोत का?

**मा. सभापती :-**

एच.पी.सी.एल. चे बोलता तर ते एका संस्थेने मिरा भाईंदर महानगरपालिकेकडे झाडे लावायला दिली आणि ती झाडे आपण लावून घ्यायची आहेत आपल्याला. म्हणजे ती संस्था आपल्याला झाडे लावण्यासाठी मदत करते आणि त्यांचे असे म्हणणे आहे, आपण ग्रुपने झाडे लावतो. रस्त्यावर, स्पॉट कुठे गार्डन अशा ठिकाणी त्यांना झाडे लावायची नाहीत, त्यांचे असे म्हणणे आहे. कुठे आपण प्लान्टेशन करतो. ''सामाजिक वनीकरण'' ह्या पद्धतीने ती झाडे लावणार आहोत आणि त्यांनी आपल्याला आठ हजार झाडे दिलेली आहेत आणि ती आठ हजार झाडे संपूर्ण लावलेली नाहीत. अंदाजे तीन हजार झाडे लागलेली आहेत. चवळी ह्या ठिकाणी आपण झाडे लावायला घेतली आहे त्याची माहिती हवी असेल कारण चवळी हा मोठा परिसर आहे. त्या करिता आपण सदरच्या बाबतीत सविस्तर माहिती सभागृहापुढे आणावी.

**रिटा शहा :-**

साहेब हा मस्करीचा विषय नाही. चवळी ठिकाण मोठे आहे का लहान आहे असे नाही.

**मा. सभापती :-**

सभेमध्ये सभेचा वेगळा मुड तुम्ही करु नका. मी येथे जबाबदार पदाधिकारी म्हणून येथे बसलो आहे आणि तुम्ही जबाबदार सदस्या आहात. त्या पद्धतीने मी तुम्हांला येथे उत्तर देतोय. संपूर्णपणे चवळी ह्या डोंगरावर कोणत्या ठिकाणी झाडे लावलेली आहेत असे ठिकाण सांगा असे मी बोलतो. ह्यात मस्करी करण्याचा विषय कुठे आला आहे.

**रिटा शहा :-**

मी पण झाडे कुठे लावली तेच विचारले पण मला उत्तर कुठे मिळाले.

**मा. सभापती :-**

मी आता अधिकाऱ्यांना तुमच्या वतीने तोच प्रश्न केला. पर्टीक्युलरली अशी कुठली जागा आहे ह्या ठिकाणी कोणत्या कोन्याला उजव्या बाजूला, डाव्या बाजूला झाडे लावली ते आपण सांगा. सन्मा. सदस्यांना आम्ही त्यांच्या प्रश्नाचे उत्तर देतो.

**मिलन म्हात्रे :-**

सभापती साहेब आता ह्या ज्या विषयावर बराच वेळ चर्चा झाली, मॅक्सवेल हॉटेलच्या समोर ह्यापुर्वी आपला जो कालावधी प्रशासकीय होता त्यावेळेला व नंतर संपतराव शिंदे अधिकारी होते त्यावेळेला बरेचसे वनीकरण नगरपालिकेतर्फे केले गेले. प्लांटिंग झाली. झाडे वाढली. सगळं काही झाले. परंतु त्या ठिकाणी नंतर ती वाढलेली झाडे कापली गेली व काही झाडे जाळली. हा मागच्या नगरपालिकेच्या सभागृहात आलेला विषय होता. जो वनीकरण करतो त्यांचे इंटेशन काय असते तर एनव्हायरमेंट प्रोटेक्शन करीता वनीकरण करत असतो. आता जी आपल्या डिपार्टमेंटतर्फे उत्तर दिले गेले. चवळी वगैरे असे उत्तर देणे बरोबर नाही. डेव्हलपमेंट प्लॅन आहे. डोंगराचे सर्व्हे नंबर आहे. जमिनीचे सर्व डेफीनेशन आहे. मालकी, खाजगी, सरकारी, कलेक्टर फॉरेस्ट ही सर्व माहिती तुमच्याकडे आहे. हे वनीकरण करतांना एक चार्ट आपण बनवायला पाहिजे होते. जी संस्था तुम्हांला आठ हजार झाडे देणार ती संस्था तुमच्या कडून हिशोब सुद्धा घेणार. आम्ही दिलेल्या झाडांचे आपण काय केले. जसे मघाशी चर्चा झाली की सर्व्हेनुसार तुम्ही त्याची हिस्ट्री शिट बनवा. ह्या सर्व्हेमध्ये पाचशे झाडे लावली. दुसरे त्याच्यामध्ये तुम्ही सर्व लिहा. गावांची नावे आली तर हे वाद होणार नाही आणि हे सर्व ह्याच्याकरिता घ्यायची आहे. आता जी तुम्ही आठ हजार झाडे लावणार ती कोण जाळणार आहे का? ती कोण कापणार आहे का? त्याची निगा कोण राखणार? त्याची जिम्मेदारी कोणाची? त्याच्याकरिता एक डेसिग्नेटेड एक जिम्मेदार अधिकारी पाहिजे. जो तो तुम्ही मघाशी उल्लेख केला. झाडे आपण लावत जायचे आणि कोणीतरी तोडफोड करणार. माझ्य माहितीनुसार जवळ जवळ वीस वीस फुट झाडे खालची मुळे जाळून ती झाडे सुकवली आहेत आणि मग कापली आहेत. मॅक्सवेलच्या येथे जो उतार आहे त्या उताराच्या येथे डोंगराची जी घळ आहे, खालची, त्या पूर्ण घळीवरती आपले वन चांगले झालेले होते. ह्याच्यातली झाडे आजही ते बुंधे जाळलेले आहेत. ते

प्रकरण तसं बघायला गेले तर फार वाढले असते. वन विभागाचे वगैरे दुर्लक्ष झाले, हा प्रकार परत घडण्याची शक्यता आहे. आता आपण ह्या बजेटमध्ये पान नं. २० मध्ये इकडे २० लाखाची तरतुद केली आहे. इकडे १.२० केली आहे. १.२० आणि ही २० म्हणजे १.४० ची तरतुद ह्यामध्ये पिंजरे वगैरे सगळं. ह्याच्यातला बहुतेक काही खर्च आला असेल. पाच दहा लाखाचा परंतु आता हे ४६ चा हिशेब लावला तर पाच प्रमाणे ४६ मध्ये जवळ जवळ २ कोटी ३२ लाखापर्यंत ही फिगर जाते. आता आपल्या बजेटमध्ये फक्त ही एवढी ह्या वर्षाची तरतुद आहे. ह्या वर्षाकरिता ह्या कामाकरिता ह्या बजेटमधला किती अमाऊंट आपण लावतोय. तसे बघायला गेले तर आपण मग १.२० पकडले तर १२ x ३ = ३६. ३.६० होतात तर ३.६० ची तरतुद करणार आहात का तुम्ही? मग तीनची करणार आहात का? अडीचची करणार आहात मग कितीपर्यंत तुमचे होईल कारण याच्यामध्ये अंदाजे २.३२ येते याचा उल्लेख येथे काहीच नाही. म्हणजे ही टोटल स्कीम पुर्ण होईपर्यंत आपल्याला महापालिकेला एवढी लाख एवढे करोड रुपये आणि इतके लाख वरची जी अमाऊंट असेल ती ही रक्कम अपेक्षित आहें असा कुठेही उल्लेख नाही साहेब फक्त ४६-४६ उल्लेख दिलेला आहे आणि त्याच्यानंतर तुमचं जे बायफग्रेशन असेल. ह्या दोन कोटीचे आपण ५०-५० लाखाचे स्लॅप करुन पहिले वर्ष, दुसरे वर्ष आणि तिसरे वर्ष अशा याच्यातील रक्कम खर्च करणार आहेत त्याची फिक्स फिगर ह्याच्यामध्ये दिलेली नाही. मघाशी साहेब टर्मस् कंडिशन बोलले ते डिटेलमध्ये आले पाहिजे. कारण कारण हा हिशेब निघतो की, २ कोटी ३२ लाख तर त्याचे आपले कुठेतरी गणित जमत नाही. कारण पहिल्या वर्षी बजेटची तरतुद १.२० आहे आणि जर त्याच्यात ५० लाख येत असतील तर वरचे जे ७० लाख आहेत आणि अधिक हे २०. हे त्याच्यातले खर्च झाले १०. म्हणजे ७० आणि २०, ९० मधले १० लेस गेले म्हणजे तुमच्याकडे हातात राहिले ८०. त्याचे आपण काय करणार आहात. ती ग्रॅंड परत जाणार आहे का? कारण माझ्या माहितीनुसार टॅकस मधली जी एक टक्का रक्कम मिळते ती ग्रॅंड परत जाणार जर आपण ती व्यय केली नाहीत हाउस टॅक्समध्ये जी एक टक्का घेता वृक्षकर तो तुमचा परत गव्हर्नमेंटला जाणार त्याचा कुठेच उल्लेख नाही. मग ती तुम्ही कुठे लावणार आहात. ह्याच्याकरिता मी तुम्हाला जे अलटरनेट दिलेलं की आपलं जे वनविभाग आहे नर्सरी आपण चालू ठेवली पाहिजे. वनौषधी चालू ठेवल्या पाहिजे आणि ह्याच्यामध्ये तो पैसा लावलेला पाहिजे. तसेच आपला टॅक्स किती वसुल झाला.

**मा. केळेकर सो. (उप आयुक्त):-**

सन्मा. सदस्य म्हात्रे साहेब आपली जी मालमत्ता करावर वृक्षकर एक टक्का दराने वसूल करतो. ते एकूण ७८ लाख रुपये वसूल केला जातो आणि आता आपण जे आजच्या निविदेमध्ये लिहिलं आहे पहिल्या वर्षी रु. ६९,००,०००/- आपण खर्च करणार आहोत. दुसऱ्यावर्षी त्यांना ६९,४०० परत ३० टक्क्यांनी खर्च होणार आणि तिसऱ्या वर्षी त्याला आपल्याला पुन्हा पैसे द्यायचे झाडाचं संगोपन तिसऱ्या वर्षी चांगल्या प्रकारे झाले असेल तर तेव्हा त्यांना ९२ लाख रुपये आपल्याला परत द्यावे लागतील. अशा तऱ्हेने तीन इंस्टॅालमेंटमध्ये त्याचं पेमेंट करणार आहोत आणि तीन वर्षाची आपण त्याची गॅरंटी घेणार ह्या वर्षामध्ये किती झाडं जगली किती झाड मृत झाली याचा सुध्दा आपण आढावा घेणार. सन्मा. सदस्यांनी अगोदर चर्चा केल्याप्रमाणे मृत झाडाची आपण त्यांच्याकडून बिलातून कपात सुद्धा त्या तऱ्हेची करु. अशा अटी शर्ती आपल्या करारामध्ये राहणार.

**मिलन म्हात्रे :-**

मी आपल्याला विचारले, एक कोटी २० लाख् जे आहेत आणि हे २० लाख म्हणजे १.४० झाले. आपल्या बजेटमध्ये तरतूद आहे. ती पहिली गोष्ट बजेटमध्ये तरतूद चुकीची आहे का बरोबर आहे? जी फिगर वर्तवली आहे ती. आता तुमचे पहिल्या वर्षात ६९ लाख जातात तर वरची अमाउन्ट जी एक्सेस राहते ती आपण काय करणार? ह्या बजेटमध्ये जी प्रोव्हिजन केलेली आहे ती. ती परत जाणार का? गर्व्हनमेन्टला. याचा आपण काय उपयोग करणार का?

**मा. सभापती :-**

वृक्षकराची रक्कम लॅप्स होता कामा नये. वरची जी अमाऊंट ठेवलेली आहे आपण ती रक्कम ॲडजेस्ट करु शकतो.

**मिलन म्हात्रे :-**

आपण त्याचा विनियोग काय करणार?

**मा. सभापती :-**

आपण जी झाडे लावतो त्याला वृक्षकराचा जर अमाऊंट पूर्ण नाही लागली तर लॅप्स होईल. ती लॅप्स होता कामा नये. हा तुमचा महत्वाचा मुद्दा आहे.

**मिलन म्हात्रे :-**

महापालिकेचे एक वनौषधी आणखी झाडाचे रोपण करण्याकरिता नर्सरी, त्या करिता आपण त्याचा खर्च करावा.

**दिनेश नलावडे :-**

सभापती साहेब, प्रकरण क्र. १२३ वृक्षारोपणाचा विषय आलेला आहे. एच.पी.सी.एल.ने ८००० झाडे आपल्याला दिलेली आहेत. त्यांचे अभिनंदन करतो या सभागृहामध्ये आपण महानगरपालिकेच्या वतीने अभिनंदनाचे पत्र दिले पाहिजे. प्रत्येक ठिकाणी आपण शहरामध्ये बघतो नवी मुंबईला बघतो नाशिकमध्ये पाहिले. मोठमोठ्या कंपन्या ज्या आहेत महिन्द्रा ॲन्ड महिन्द्रा, फिलीप्स ज्या कंपन्या आहेत. त्या प्रत्येक शहराला अशा प्रकारच्या झाडे आणि जाळ्यांची स्वतःची जाहिरात करतात. अशा प्रकारे पुढच्या वर्षी आपण महानगरपलिकेमार्फत मोठ्या कंपन्यांना भेट दिली तर ते आपल्याला निश्चित मदत करतील आणि आपले जे करोड रुपयांचे जे नगरपालिकेचे नुकसान होत आहे ते आपल्याला मोफतमध्ये काम करुन मिळेल.

**रिटा शहा :-**

आता आपण सांगितले, झाडे कुठे व कशी लावणार ते पुढच्या मिटींगला सांगण्यात येईल आता जी ८००० झाडे लावणार आहेत. ती लावायचा खर्च ह्याच्यामध्ये समाविष्ट केलेला आहे की, वेगळा आहे?

**मा. केळेकर सो. (उप आयुक्त):-**

फक्त झाडे दिलेली आहेत आणि ती आपलेच कर्मचारी लावणार आहेत.

**रिटा शहा :-**

हे जे पाच विभाग पाडलेले आहेत त्याच्या अंतर्गत आपण टोटल किती खर्च होणार ते दिलेले आहे पण एकूण किती झाडे लावणार त्याचा अंदाज दिलेला नाही.

**गोविंद परब :-**

प्रत्येक विभागाला ३००० झाडे लावणार.

**रिटा शहा :-**

आणि ८००० झाडे वेगळी आहेत का?

**गोविंद परब :-**

ही झाडे मेन रोडला लावणार आहेत.

**मा. सभापती :-**

ती जी ८००० झाडे दिलेली आहेत ती वनीकरण पद्धतीने म्हणजे ग्रुप प्लान्टेशन प्रमाणे दिलेली आहेत. आपण मघाशी नुकसानीबाबत बोललात तर यामध्ये आपल्याला काही नुकसान होणार नाही कारण आपल्याला जो एक टक्का टॅक्स वृक्षारोपणाचा येतो. त्याच्यासाठी वृक्षारोपण केलेच पाहिजे. हे कंपलसरी आपल्याला केलेच पाहिजे. म्हणजे ते ही लॅप्स होता कामा नये आणि ॲडिशनल झाडे दिली तर शहर अजून सुशोभित दिसेल.

**दिनेश नलावडे :-**

आपण जो एक टक्का करामधून वृक्षारोपणासाठी घेतो. मिरा भाईंदर शहरातील मोठमोठे बिल्डर आपल्याला वृक्षारोपणासाठी मदत करु शकतील.

**मा. सभापती :-**

वृक्षारोपणाचा पैसा हा त्याच ठिकाणी लावला गेला पाहिजे. तुम्ही मांडलेली सुचना चांगली आहे अशा जर समोरुन संस्था आल्या तर आपण त्यांचे स्वागत करु.

**अशोक पाटील :-**

वृक्ष प्राधिकरण समितीची पुर्तता कधीपर्यंत होईल?

**मा. सभापती :-**

पुढच्या सभेपर्यंत होईल.

**मिलन म्हात्रे :-**

वृक्ष प्राधिकरण समितीला नांवे दिलेली नाहीत असे मागे सचिव साहेब बोलत होते म्हणून ते काम थांबले आहे. बहुतेक बी.जे.पी. वाल्यांची नांवे आलेली नाहीत. ते एकदा क्लीअर करुन कार्यरत करा.

**प्र. सचिव :-**

आज नांवे आलेली आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

ते जर लवकर केले असते तर आज समिती स्थापन झाली असती.

**प्रकरण क्र. १२३ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका परिसरात विविध पाच विभागात झाडे लावून त्यांची तीन वर्षे देखभाल करणेबाबत प्राप्त ठेकेदारांची निविदा मंजुर करणे.

**ठराव क्र. १०६ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका परिसरात विविध पाच विभागात झाडे लावून त्यांची तीन वर्षे देखभाल करणे कामी जाहिर निविदा दै. सकाळ व सा. सुरज प्रकाश या वृत्तपत्रात दि. ३०/०६/२००३ रोजी प्रसिद्ध करुन मागविण्यांत आल्या होत्या. त्यानुसार खालीलप्रमाणे ठेकेदारांकडून मुदतीत निविदा प्राप्त झाल्या होत्या. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | विभाग | परिमाण | निविदाधारक | व दर |
|---|---|---|---|---|
| १. | मिरा रोड विभाग | ३००० नग | १. मे. फॉरेस्ट डेव्हलपमेंट कार्पो. ऑफ महाराष्ट्र लि. | रु. १५५०/- प्र. नग<br>एकूण रु. ४६,५०,०००/- |
| | | | २. मे. दिप डेव्हलपर्स | रु. १८१०/- प्र. नग<br>एकूण रु. ५४,३०,०००/- |
| | | | ३. मे. व्होरा कंन्स्ट्रक्शन | रु. १५७५/- प्र. नग<br>एकूण रु. ४७,२५,०००/- |
| | | | ४. सिंधूदुर्ग कंन्स्ट्रक्शन | रु. १६००/- प्र. नग<br>एकूण रु. ४८,००,०००/- |
| २. | काशिमिरा ते घोडबंदर | ३००० नग | १. मे. फॉरेस्ट डेव्हलपमेंट कार्पो. ऑफ महाराष्ट्र लि. | रु. १५५०/- प्र. नग<br>एकूण रु. ४६,५०,०००/- |
| | | | २. मे. दिप डेव्हलपर्स | रु. १५७५/- प्र. नग<br>एकूण रु. ४७,२५,०००/- |
| | | | ३. मे. गुरुजी कंन्स्ट्रक्शन | रु. १६२५/- प्र. नग<br>एकूण रु. ४८,७५,०००/- |
| | | | ४. सिंधूदुर्ग कंन्स्ट्रक्शन | रु. १६००/- प्र. नग<br>एकूण रु. ४८,००,०००/- |
| ३. | मुर्धे ते उत्तन | ३००० नग | १. मे. फॉरेस्ट डेव्हलपमेंट कार्पो. ऑफ महाराष्ट्र लि. | रु. १५५०/- प्र. नग<br>एकूण रु. ४६,५०,०००/- |
| | | | २. मे. दिप डेव्हलपर्स | रु. १९००/- प्र. नग<br>एकूण रु. ५७,००,०००/- |
| | | | ३. मे. गुरुजी कंन्स्ट्रक्शन | रु. १५८५/- प्र. नग<br>एकूण रु. ४७,५५,०००/- |
| | | | ४. सिंधूदुर्ग कंन्स्ट्रक्शन | रु. १६००/- प्र. नग<br>एकूण रु. ४८,००,०००/- |
| ४. | भाईंदर पूर्व | ३००० नग | १. मे. फॉरेस्ट डेव्हलपमेंट कार्पो. ऑफ महाराष्ट्र लि. | रु. १५५०/- प्र. नग<br>एकूण रु. ४६,५०,०००/- |
| | | | २. मे. दिप डेव्हलपर्स | रु. १९८०/- प्र. नग<br>एकूण रु. ५९,४०,०००/- |

| अ.क्र. | विभाग | परिमाण | निविदाधारक | व दर |
|---|---|---|---|---|
| | | | ३. मे. व्होरा कंन्स्ट्रक्शन | रु. १६५०/- प्र. नग<br>एकूण रु. ४९,५०,०००/- |
| | | | ४. सिंधूदुर्ग कंन्स्ट्रक्शन | रु. १५७५/- प्र. नग<br>एकूण रु. ४७,२५,०००/- |
| ५. | भाईंदर पश्चिम | ३००० नग | १. मे. फॉरेस्ट डेव्हलपमेंट कार्पो. ऑफ महाराष्ट्र लि. | रु. १५५०/- प्र. नग<br>एकूण रु. ४६,५०,०००/- |
| | | | २. मे. दिप डेव्हलपर्स | दर नमुद केले नाहीत. |
| | | | ३. मे. किर्ती पी. व्होरा | रु. १५७५/- प्र. नग<br>एकूण रु. ४७,२५,०००/- |
| | | | ४. सिंधूदुर्ग कंन्स्ट्रक्शन | रु. १६००/- प्र. नग<br>एकूण रु. ४८,००,०००/- |

वरील प्रमाणे तुलनात्मक तक्ता पहाता अ.क्र. १ ते ५ विभागाकरिता प्राप्त निविदांमध्ये मे. फॉरेस्ट डेव्हलपमेंट कार्पो. ऑफ महाराष्ट्र लि. यांचे दर सर्वात कमी हाते परंतु महापालिकेच्या निविदेतील अटी शर्ती व्यतिरिक्त निविदेसोबत अन्य जास्त जाचक अटीशर्ती जोडून त्या अटीशर्तीनुसार काम करण्यास तयार असल्याचे नमुद केले होते. परंतु त्यांना समक्ष चर्चेकरीता बोलाविले असता त्यांनी दि. ०५/०८/२००३ रोजी महानगरपालिकेच्या निविदेतील अट क्र. ४ व ६ मनपा शिथील करण्यांस तयार असल्यास काम करण्यांस तयार असल्याचे नमुद करुन गट लागवड करण्यांस इच्छुक असल्याचे म्हटले आहे. त्यामुळे त्यांच्या पाचही निविदा या कमी दराच्या असल्या तरी महानगरपालिकेच्या निविदेतील अटीशर्ती त्यांना मान्य नसल्याने त्यांची निविदा मान्य करता येत नाही. परंतु अन्य निविदा धारक यांना वाटाघाटीस बोलविले असता त्यांनी मे. फॉरेस्ट डेव्हलपमेंट कार्पो. ऑफ महाराष्ट्र लि. यांचे दरापेक्षा कमी दराने काम करण्यांस तयार असल्याचे लेखी पत्र दिलेली आहेत. या नुसार कमी दराने काम करण्यांस तयार असलेल्या निविदा धारकांना तपशील पुढील प्रमाणे.

| अ.क्र. | विभाग | निविदाधारक | व दर |
|---|---|---|---|
| १. | मिरा रोड विभाग | मे. व्होरा कंस्ट्र. | रु. १५४०/- प्र. नग |
| २. | काशीमिरा ते घोडबंदर | मे. दिप डेव्हलपर्स | रु. १५४७/- प्र. नग |
| ३. | मुर्धे ते उत्तन विभाग | मे. गुरुजी कंस्ट्रक्शन | १५४५/- प्र. नग |
| ४. | भाईंदर पुर्व | मे. सिंधूदुर्ग कंस्ट्रक्शन | १५४०/- प्र. नग |
| ५. | भाईंदर पश्चिम | मे. किर्ती पी. व्होरा | १५४०/- प्र. नग |

उक्त पाच निविदाधारक यांची वेगवेगळ्या विभागात सर्वात कमी दराच्या निविदा असून महानगरपालिका परिसरात खड्डे खोदून लाल माती, शेणखत, संरक्षण जाळ्यासह झाडे लावून त्यांची ३ वर्षे देखभाल करणे करीता तयार असल्याने त्यांच्या निविदा मंजुर करण्यांत येत आहेत. तसेच वृक्ष लागवड करणे या लेखा शिर्षाखाली सन २००३-०४ च्या अर्थसंकल्पात एकत्रित रु. १.२० कोटीची तरतुद आहे. या तरतुदीप्रमाणे प्रत्येक विभागातील निविदा धारकांस झाडांची ३ वर्षे पर्यंत देखभाल करावयाची असल्याने देयकाचे प्रदान पुढील प्रमाणे टप्प्या टप्प्याने करण्यांत मंजुरी देण्यांत येते.

प्रथम वर्ष :- ठेकेदारांस दिलेली झाडे लावण्याचा इष्टांक पूर्ण केला की, जगलेल्या झाडांच्या प्रमाणात मंजुर दराचे २० टक्के रक्कम (सप्टेंबर २००३) व वर्षाअखेर २० टक्के रक्कम. (मार्च २००४)

दुसरे वर्ष :- जगलेल्या झाडांचे प्रमाणात मंजुर दराप्रमाणे पहिल्या सहामाहीनंतर १५ टक्के रक्कम (सप्टेंबर २००४) व वर्षाअखेर १५ टक्के रक्कम. (मार्च २००५)

तिसरे वर्ष :- जगलेल्या झाडांचे प्रमाणात मंजुर दराप्रमाणे पहिल्या सहामाहीनंतर १५ टक्के रक्कम (सप्टेंबर २००५) व वर्षअखेर शेवटचा हप्ता एकूण जगलेली सर्व झाडे ३ वर्षाच्या कालावधीची आहेत असा सामाजिक वनिकरण यांचा दाखला सादर केल्यानंतर (मार्च २००६) उर्वरित १५ टक्के रक्कम प्रदान करण्यांत येईल.

वरील पाच विभागात ठेका पद्धतीने झाडे लावून ३ वर्षे देखभाल करुन जगविणेंच्या कामापोटी ठेकेदारांच्या वेळोवेळी येणाऱ्या देयकाच्या प्रदानास ही सभा आर्थिक व प्रशासकिय मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. दिनेश नलावडे. अनुमोदन :- श्री. हरेश गावंड.**
**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**याकुब कुरेशी :-**

मा. आर. आर. पाटील, ग्रामीण व पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री यांचा आज ४६वा वाढदिवस असल्यामुळे त्यांना वाढदिवसाची हार्दिक शुभेच्छा देता आणि अभिनंदनाचा ठराव मांडतो.

**टराव क्र. १०७ :-**

मिरा भाईंदर परिसरातील ग्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री मा. श्री. आर. आर. पाटील यांच्या ४६व्या वाढदिवसानिमित्त ही सभा श्री. आर. आर. पाटील यांना हार्दीक शुभेच्छा देऊन त्यांचे अभिनंदन करीत आहे.

**सुचक :- श्री. आसिफ शेख. अनुमोदन :- श्री. हॅरल बोर्जीस.**
**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. सभापती :-**

सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, अधिकारी वर्ग, कर्मचारी वर्ग आपणा सर्वांचे आभार मानून आजची सभा येथे संपल्याचे जाहिर करत आहे.

**सभा संपल्याची वेळ :- दु. ०१.३० वा.**

**सभापती**
**स्थायी समिती,**
**मिरा भाईदर महानगरपालिका**

**प्रभारी सचिव,**
**मिरा भाईदर महानगरपालिका**